https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

दैनिक

# समर्थ राजयोग

वैभव विवेक स्वामी
संपादक

SAMARTH RAJYOG

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष - ६ वे अंक -२१६ गुरुवार दि.१६ एप्रिल २०२६ 98 22 62 85 21 आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु । पाने ४

Beed Daily Marathi Year-6th Issue-216 Thursday, Dt.16 April 2026 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4


# बिहारमध्ये 'सम्राट' पर्व सुरू: भाजपने रचला इतिहास

# ७५ वर्षांत पहिल्यांदाच भाजपचा मुख्यमंत्री!



पाटणा: बिहारच्या राजकीय इतिहासात आज सुवर्णअक्षरांनी नोंदवली जाणारी घटना घडली आहे. गेल्या अनेक दशकांपासून मित्रपक्षांच्या सोबतीने सत्तेत असणाऱ्या भारतीय जनता पक्षाने अखेर बिहारमध्ये आपला झेंडा पूर्णपणे फडकवला आहे. भाजपचे ज्येष्ठ नेते सम्राट चौधरी यांनी बिहारचे नवे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली असून, बिहारच्या ७५ वर्षांच्या इतिहासात भाजपचा मुख्यमंत्री होण्याची ही पहिलीच वेळ आहे.

मुख्यमंत्र्यांचा शपथविधी सोहळा

पाटणा येथील राजभवनात आयोजित एका भव्य सोहळ्यात राज्यपालांनी सम्राट चौधरी यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. यासोबतच मंत्रिमंडळातील इतर महत्त्वाच्या मंत्र्यांनीही शपथ घेतली. या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी भाजपचे अनेक केंद्रीय नेते आणि हजारो कार्यकर्ते उपस्थित होते.

७५ वर्षांची प्रतीक्षा संपली

स्वातंत्र्यानंतर बिहारमध्ये विविध पक्षांची आणि युतीची सरकारे राहिली. भाजप नेहमीच 'दुय्यम' भूमिकेत किंवा मित्रपक्षाच्या सोबतीने सत्तेत राहिला होता. मात्र, यंदा पक्षाने स्वबळावर आणि आपल्या रणनीतीच्या जोरावर राज्याची धुरा आपल्या हाती घेतली आहे.

कोण आहेत सम्राट चौधरी?

सम्राट चौधरी हे बिहार भाजपचे आक्रमक आणि अनुभवी चेहरे म्हणून ओळखले जातात.त्यांच्याकडे राज्याचा एक मोठा ओबीसी चेहरा म्हणून पाहिले जाते, ज्यामुळे भाजपची सामाजिक समीकरणे अधिक मजबूत झाली आहेत. सम्राट चौधरी यांना राजकारणाचा प्रदीर्घ अनुभव असून त्यांनी यापूर्वी विविध खात्यांचे मंत्रिपदही भूषवले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांनी सम्राट चौधरी यांचे अभिनंदन केले असून, बिहारमध्ये आता विकासाचे नवे पर्व सुरू होईल, असा विश्वास व्यक्त केला आहे. दुसरीकडे, विरोधी पक्षांनी या बदलावर सावध प्रतिक्रिया दिली असून, आगामी निवडणुकांमध्ये याचे काय परिणाम होतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## केंद्रीय मुख्याध्यापक गोरक्ष खेडकर यांचा शनिवारी सेवापूर्ती सोहळा

मानूर /प्रतिनिधी ह्व

शिरूर शहरातील केंद्रीय कन्या शाळेचे मुख्याध्यापक गोरक्ष नामदेव खेडकर यांचा सेवापूर्ती सोहळा शनिवार दि.१८ एप्रिल रोजी सिद्धेश्वर संस्थानच्या सभागृहात सकाळी ११ वाजता संपन्न होणार आहे.गोरक्ष खेडकर हे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत असून त्यांनी जवळपास शिक्षणक्षेत्रात ३८ वर्ष अविरतपणे सेवा केली आहे.खरवंडी येथील भगवान विद्यालयापासून त्यांनी आपल्या सेवेला सुरुवात करत जि.प.प्रा.शाळा,



सरदवाडी,जाटनांदूर,घाटशीळ पारगाव,महिंदा आणि शेवटी शिरूर येथील केंद्रीय कन्या शाळेत नोकरी केली आहे.गोरक्ष खेडकर यांना त्यांच्या शैक्षणिक कामगिरीबद्दल जिल्हा परिषदेचा आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाला असून या शिवाय क्रस्टाईब कर्मचारी

पान २ वर..

## भ्रष्ट कारभाराचे वाभाडे अंबड तत्कालीन तहसीलदारांचा तो बेकायदेशीर जमिनीचा आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी उडवला

### अंबडच्या तत्कालीन तहसीलदारांना दणका शिरनेर येथील सीलिंग जमीन घोटाळा उघड दोषींवर कारवाईची टांगती तलवार

अंबड /शेख फारुक

महसूल प्रशासनातील अधिकारांचा गैरवापर करून सीलिंग च्या जमिनीची विल्हेवाट लावणाऱ्या तत्कालीन तहसीलदारांच्या मनमानी कारभाराला जिल्हाधिकाऱ्यांनी जोरदार चपराक दिली आहे. मौजे शिरनेर येथील कोट्यवधींच्या जमिनीबाबतचा बेकायदेशीर आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी रद्द ठरवल्याने महसूल विभागात खळबळ उडाली असून जनतेतून या धाडसी निर्णयाचे स्वागत होत आहे.

अंबड तालुक्यातील मौजे शिरनेर येथील गट नं.२०२ मधील २ हेक्टर ११ आर ही जमीन मूळची भोगवटादार वर्ग-२ सीलिंग स्वरूपाची होती. मात्र तत्कालीन तहसीलदार श्री. चंद्रकांत शेळके यांनी



महसूल कायद्यातील सर्व नियम धाब्यावर बसवून आपल्या अधिकाराचा जास्तीत जास्त गैरवापर केला. १६ फेब्रुवारी २०२४ रोजी त्यांनी कोणताही कायदेशीर आधार नसताना ही जमीन वर्ग-१ त्रीशशहेश्रव मध्ये रूपांतरित करण्याचा धक्कादायक आदेश दिला होता.

जिल्हाधिकाऱ्यांचा सर्जिकल स्ट्राईक

या गंभीर जमीन घोटाळ्याविरोधात जागरूक नागरिकांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांकडे या बेकायदेशीर कृत्याविरुद्ध तक्रारींचा पाऊस पडल्यानंतर, जिल्हाधिकाऱ्यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेतली. महाराष्ट्र जमीन महसूल

पान २ वर..

### पेठ बीड पोलीसांनी खुनाचा प्रयत्न या गुन्ह्या मधील एक महीण्या पासुन

## फरार असलेला सराईत गुन्हेगाराचा ३५ कि.मी. पर्यंत पाठलाग करुन केले जेरबंद

बीड /प्रतिनिधी

दिनांक ०४/०३/२०२६ रोजी फिर्यादी नामे अमोल अशोकराव कांबळे वय ३८ वर्षे रा. बार्शी नाका बीड यांनी फिर्याद दिली की, आरोपी नामे अभिषेक डोंगरे, दादा डोंगरे, पोपट डोंगरे, कोल्ह्या डोंगरे व इतर यांनी फिर्यादीची ट्रॅव्हल्सची स्टेपनी काढून घेवुन फिर्यादीस स्टेपनी परत पाहीजे असेल तर १० हजार रुपये दे असे म्हणून फिर्यादी सोबत हुज्जत घालुन आरोपी नामे अभिषेक डोंगरे यांने त्याचे हातातील लोखंडी हत्यार ने फिर्यादीस जिवे मारण्याचे उद्देशाने डोक्यात वार करुन गंभीर जखमी केले तसेच इतर आरोपीतांना देखील जिवे मारण्याच्या उद्देशाने लोखंडी रोड तसेच




लाथाबुक्याने मारहाणकरुन जखमी केले वगैरे फिर्याद वरुन पो.स्टे.ला गुरनं. ७१/२०२६ कलम १०९,१८९(२),१८९(४),१९०,१९१(२),१९१(३),११९(१),११९(२),११८(१),११५(२),३५२,३५१(२) भारतीय न्याय संहीता २०२३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन सदर गुन्ह्या केल्या पासुन वरील आरोपी हे फारार होते.

काल दिनांक १४/०४/२०२६ रोजी आरोपी नामे अभिषेक विश्वास ऊर्फ पोपट डोंगरे वय २५ वर्षे रा. सोन्नखोटा ता. वडवणी जि.बीड हमु. प्रकाश आंबेडकर नगर इमामपुर रोड बौड ता.जि.बीड हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती मिरवणुक मध्ये छत्रपती शिवाजी महाराज चौक बीड येथे आल्याची गुप्त माहीती मिळाले वरुन पोलीस ठाणे पेठ बीड येथील डि बी. पथक व इतर अंमलदार असे सदर ठिकाणी सापळारचुन आरोपीस पकडण्याचा प्रयत्न केला असता गर्दीचा व अंधाराचा फायदा

पान २ वर..

## पात्रुड-लोणगाव रस्त्याची दुरावस्था; वाहनधारक हैराण, तातडीने दुरुस्तीची मागणी



माजलगाव प्रतिनिधी

तालुक्यातील पात्रुड ते लोणगाव हा महत्त्वाचा संपर्क मार्ग सध्या अत्यंत खराब अवस्थेत असून या रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

अनेक ठिकाणी मोठमोठे खड्डे पडले असून रस्त्याची पृष्ठभाग पूर्णपणे उखडून निघाला आहे. परिणामी वाहनधारकांना दररोज जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे.

या रस्त्यावरून दररोज शेकडो दुचाकी, चारचाकी तसेच शेतीसाठी वापरली जाणारी वाहने ये-जा करतात. मात्र सध्या रस्त्याची झालेली दुरावस्था पाहता वाहन चालवणे म्हणजे कसरतच ठरत आहे. विशेषतः पावसाळ्यात या खड्ड्यांमध्ये पाणी साचल्यामुळे खड्ड्यांची खोली लक्षात येत नाही आणि अपघात होण्याची शक्यता अधिक वाढते. अनेक वेळा दुचाकीस्वार घसरून पडल्याच्या घटना देखील घडल्या आहेत.

पान २ वर..

## डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा अवमान करणाऱ्या न.प. अधिकाऱ्यांना निलंबित करा:पप्पू कागदे



बीड/प्रतिनिधी

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीनिमित्त काढण्यात येणाऱ्या मिरवणूक मार्गावरती घाण पाणी सोडून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा अवमान करणाऱ्या व रस्त्यावर चर,खडी टाकून अनेक आंबेडकरी अनुयायांना जखमी करण्यास कारणीभूत असलेल्या बीड नगर परिषद बांधकाम अभियंता किरण देशमुख व पाणीपुरवठा अभियंता प्रमोद माने यांना तात्काळ निलंबित करण्यात यावे. अशी मागणी युवा रिपाइंचे प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांना निवेदन देऊन केली.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीनिमित्त काढण्यात येणाऱ्या मिरवणूक मार्गावरती बारीक चर,खडी टाकून घाण पाणी सोडल्यामुळे खडीवरून घसरून अनेक महिला भगिनी, पुरुष व रिपाइंचे बीड शहराध्यक्ष अविनाश जोगदंड जबर जखमी झाले आहेत. ही बाब अत्यंत

पान २ वर..





## आ.सुरेश धस यांनी मागणी करताच सीना प्रकल्पातून पाणी सोडले

आष्टी - (प्रतिनिधी) आष्टी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या पाणी प्रश्नावर आमदार सुरेश धस यांनी पत्राद्वारे मागणी करताच त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश मिळाले असून, सीना प्रकल्पाच्या उजव्या कालव्यातून सिंचनासाठी पाणी सोडण्यास सुरुवात करण्यात आली आहे. आमदार सुरेश धस यांच्या या निर्णयामुळे परिसरातील शेतकरी व ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळाला आहे.

आष्टी मतदारसंघात आमदार सुरेश धस यांनी कुकडी पाटबंधारे विभाग क्र. २, श्रीगोंदा येथील कार्यकारी अभियंत्यांना पत्राद्वारे आष्टी तालुक्यातील सीना प्रकल्पाच्या लाभ क्षेत्रातील पिंपरी (घुमरी), कानडी बुद्रुक

पान २ वर..

## घनसावंगी तालुक्यात भीषण आग; हायवा ट्रक जळून खाक

घनसावंगी प्रतिनिधी :- तालुक्यातील गुज परिसरातून वाळू भरून येणाऱ्या हायवा ट्रकला अचानक लागलेल्या भीषण आगीमुळे परिसरात एकच खळबळ उडाली. कुंभारी पिंपळगाव ते अंबड राष्ट्रीय महामार्गावर आज सायंकाळी सुमारे सहा वाजण्याच्या सुमारास ही थरारक घटना घडली.टाटा कंपनीच्या हायवा ट्रकने प्रवासादरम्यान अचानक पेट घेतल्याने वाहन काही क्षणांतच आगीच्या भक्ष्यस्थानी सापडले. मात्र चालकाने प्रसंगावधान राखत तात्काळ ट्रक थांबवून खाली उडी घेतल्यामुळे संभाव्य



### चालकाच्या प्रसंगावधानामुळे मोठा अनर्थ टळला

मोठी जीवितहानी टळली.

आग लागल्याची माहिती मिळताच स्थानिक गावकरी घटनास्थळी धावून आले. नितीन शिवाजी घुगे, कृष्णाआपा भूतेकर तसेच गाडी मालक सतीश गायकवाड (रा. संभाजीनगर) यांनी तत्परतेने अग्निशमन दलाला कळवले.

माहिती मिळताच अग्निशमन दलाची गाडी तातडीने घटनास्थळी दाखल झाली आणि अथक प्रयत्नांनंतर आगीवर नियंत्रण मिळवले. मात्र तोपर्यंत हायवा ट्रक पूर्णपणे जळून खाक झाला होता.

या घटनेमुळे काही काळ वाहतुकीवर परिणाम झाला होता. सुदैवाने या भीषण आगीत कोणतीही जीवितहानी झाली नसून संबंधित विभागाकडून पुढील तपास सुरू आहे.चालकाच्या सतर्कतेमुळे आणि अग्निशमन दलाच्या तत्परतेमुळे मोठा अनर्थ टळल्याने परिसरात समाधान व्यक्त केले जात आहे.


शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5

## संपादकीय....

# ‘कोकणचा राजा’ जायबंदी!

फेब्रुवारी ते जूनदरम्यान मुंबईच्या फळ मार्केटमध्ये हापूस आंब्याच्या विक्रीला मोठी गती मिळत असून गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर कोट्यवधींची उलाढाल झाली. रत्नागिरी व देवगड हापूसची आवक अवकाळी पाऊस आणि कीड हल्ल्यांमुळे घटली असून त्यामुळे दर गगनाला भिडले आहेत. आखाती युद्धामुळे निर्यात ठप्प झाल्याने यंदा स्थानिक बाजारात हापूस आंबा मुबलक प्रमाणात उपलब्ध झाला आहे.

फेब्रुवारी ते जून या पाच महिन्यांच्या कालावधीत मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या फळ मार्केटमधील उलाढालीला कमालीची गती मिळालेली असते. फळ मार्केटमध्ये देशाच्या कानाकोपऱ्यांतून तसेच परराज्यातूनही फळे विक्रीला येत असतात. या मार्केटमध्ये देशाच्या अनेक राज्यांतून आंबे विक्रीला येत असले तरी कोकणचा हापूस हा आंबा खवय्यांच्या पसंतीचा असतो. वर्षभर वाट पाहिल, पण खाल्ला तर हापूसच खाईन, असे आंबाप्रेमी अभिमानाने सांगत असतात. गुढीपाडवा, अक्षय्य तृतीया, राम नवमी व अन्य सणांना घराघरांमध्ये हापूस आंब्याच्या रसाचा कार्यक्रम ठरलेलाच असतो. त्यामुळे अन्य दिवसांच्या तुलनेत या दिवसांसाठी आंबा विक्रीच्या उलाढालीचा आलेख कमालीचा उंचावलेला असतो. कोकणच्या रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग अशा तीन जिल्ह्यांतून मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई, पनवेल येथील नागरिकांसाठी आंबा विक्रीला येत असला तरी रायगडच्या तुलनेत रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील हापूसला अधिक मागणी असते व चवीचा दर्जाही काही वेगळाच असतो. भाज्या आणि फळभाज्या मार्केटमध्ये विक्रीला शेतकऱ्यांकडून थेट येत असतात. हापूस आंब्याचे गणित त्या तुलनेत वेगळे असते. मार्केटमध्ये आंबा उत्पादक शेतकऱ्यांनी आंबा थेट विक्रीला पाठविण्याचे प्रमाण नगण्य असते. मार्केटमधील व्यापारीच कोकणात जाऊन थेट बागांचाच सौदा करत असल्याने फळांचे पैसे शेतकऱ्याला जागेवरच उपलब्ध होत असतात. गुढीपाडव्याच्या दिनी मार्केटमध्ये कोट्यवधी रुपयांची उलाढाल आंबा विक्रीतून झालेली आहे. खवय्यांची आंब्याला असलेली पसंती पाहून अन्य राज्यातील आंबा उत्पादक महाराष्ट्रातील शहरी भागातील मार्केटमध्ये आंबा विक्रीला पाठवत असतात. कोकणच्या हापूसच्या खालोखाल कर्नाटकच्या आंब्याने मार्केट व्यापलेले असते. एपीएमसी मार्केटमधील प्रत्येक विंगमधील गाळ्यागाळ्यावर हापूस आंब्यांनी जागा व्यापलेली आहे. रत्नागिरी जिल्ह्यातून रत्नागिरी, लांजा, राजापूर भागातून तर सिंधुदुर्गचा देवगड हापूस विक्रीला आला आहे. रायगड जिल्ह्यातील किनारपट्टी भागातूनही हापूस आंबा विक्रीला आला आहे. जानेवारी महिन्यापासूनच हापूस आंब्याची मार्केटला तुरळक आवक येण्यास सुरुवात होते, एप्रिलच्या मध्यापासून हापूस आंब्याची आवक वाढून दररोज लाखांच्या संख्येने हापूस आंब्याच्या पेट्या मार्केटमध्ये विक्रीला येत असतात. आवक वाढल्यावर याच कालावधीत हापूस आंब्याचे दर सर्वसामान्यांच्या आवाक्यात येतात. मार्केटमध्ये कोकणच्या हापूस आंब्याव्यतिरिक्त केरळ, कर्नाटक आणि आंध्र प्रदेशातूनही काही प्रमाणात ‘हापूस’ सदृश आंबा विक्रीसाठी येत असतो. दरवर्षीच्या तुलनेत हापूस आंब्याची आवक कमी झालेली आहे. फुलोऱ्याच्या वेळी झालेल्या अवकाळी पावसामुळे आणि कीड हल्ल्यांमुळे आंब्याच्या काढणीला विलंब झाला असून, रत्नागिरी आणि देवगड हापूसची आवक घटली आहे आणि शहरभरातील हंगामाच्या सुरुवातीच्या पुरवठ्याचे स्वरूप बदलले आहे. आंबा आवकच मंदावल्याने किमती गगनभरारी घेत आहेत. हापूसचे दर ५ ते ९ डझनाच्या पेटीचे २ ते ८ हजार रुपये आहेत. आखाती युद्ध सुरू असल्याने हापूस आंब्याची हक्काची बाजारपेठ ओळखली जाणाऱ्या आखाती देशांमध्ये हापूसची निर्यात अजून सुरू झालेली नाही व युद्धामुळे लवकर निर्यात होण्याची शक्यताही नाही. त्यामुळे स्थानिक बाजारातील मार्केटमध्ये आंबा विकला जाणार असल्याने यंदा खवय्यांना आंबा मुबलक प्रमाणावर उपलब्ध होणार आहे.

# पुस्तक वाचनाने माणूस घडतो :- प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर

**सौ. के.एस.के. महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सलग १८ तास वाचन उपक्रम**

बीड (प्रतिनिधी) :- येथील सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकू, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील ग्रंथालय विभागात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त सलग १८ तास वाचन उपक्रम दिनांक १२ एप्रिल २०२६ रोजी राबवण्यात आला.



या वाचन उपक्रमा प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर यांनी वाचकांना मागदर्शन केले. ते म्हणाले की, विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी असे उपक्रम आवश्यक आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी असे म्हटले आहे की, शिका, संघटीत व्हा, संघर्ष करा हा नारा अवघे जिवन बदलण्यासाठी पर्याप्त आहे. पुस्तके वाचल्याने माणूस घडला जातो व त्याच्या व्यक्तीत्वाचा विकास होतो. त्यामुळे जास्तीत जास्त वेळ पुस्तके वाचण्यासाठी दिला पाहिजे.

यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. संजय पाटील देवळानकर, उपप्राचार्य डॉ. अनिता शिंदे, पदव्युत्तर विभाग प्रमुख डॉ. खान. ए. एस. , कमवि उपप्राचार्य डॉ. नारायण काकडे, पर्यवेक्षक प्रा. जालिंदर कोळेकर, ग्रंथपाल प्रा. शेख जी. आय. उपस्थित होते. तसेच या उपक्रमात महाविद्यालयातील विद्यार्थी यांनी सलग १८ तास वाचन केले. या उपक्रमात एकून २० विद्यार्थी व प्राध्यापक सहभागी झाले होते . हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रंथालयातील श्री. अंगद दराडे व श्री. लक्ष्मण सोन्नर यांचे सहकार्य लाभले.



# महात्मा फुले यांनी सामाजिक क्रांती घडवली : डॉ. प्रमोद गायके

**सौ के.एस.के. महाविद्यालयात महात्मा ज्योतीराव फुले यांची जयंती साजरी**

बीड /प्रतिनिधी

दिनांक ११ एप्रिल २०२६ रोजी महाविद्यालयात महात्मा ज्योतीराव फुले यांची १९९ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी प्राणिशास्त्र विभागाचे डॉ. प्रमोद गायके यांनी महात्मा ज्योतीराव फुले यांचे सामाजिक व शैक्षणिक कार्यावर आपले विचार व्यक्त केले. ते म्हणाले की, अठराव्या शतकामध्ये ज्योतीराव फुले यांनी मुलींची पहिली शाळा काढून शैक्षणिक क्षेत्रात मोठी क्रांती घडवून आणली. आज देश जो प्रगती पथावर आहे त्यामध्ये महात्मा ज्योतीराव फुले यांचा मोठा वाटा आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर हे होते. त्यांनी आपले विचार व्यक्त करताना असे म्हटले की, महात्मा ज्योतीरावांनी सामाजिक आणि शैक्षणिक कार्य मोठया प्रमाणात केल्याने आज समाज प्रगती पथावर आहे. मुलींची शाळा काढून सामाजिक क्रांती घडवून आणली. समाजामध्ये जातीय निर्मुलनासाठी महात्मा ज्योतीरावांनी फार मोठे कार्य केलेले आहे. ज्योतीराव हे उत्कृष्ट लेखकही होते.

# बीड जिल्हा रुग्णालयात मोठ्या थाटामाटात डॉं बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी

**तुम किताबो के सामने झूको, तुम्हारे आगे दुनिया झुका दूंगा - जिल्हा शल्य चिकित्सक डॉ सतीशकुमार सोळुंके**

बीड /प्रतिनिधी

महामानव भारतरत्न डॉं. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती बीड जिल्हा रुग्णालयात उत्साहात साजरी करण्यात आली व डॉ. बाबासाहेबाना अभिवादन करण्यात आले. संविधान फॉउंडेशन बीड कर्मचारी यांच्याकडून कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. खुप वर्षानंतर जिल्हा रुग्णालतात मोठ्या थाटामाटात जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या मोलाच्या सहकार्याने व मार्गदर्शनाने जयंती साजरी करण्याच भाग्य जिल्हा रुग्णालयातील कर्मचाऱ्यांना लाभले.यावेळी मोठ्यां साख्येने कर्मचारी वर्ग व विद्यार्थिनी उपस्थित होते. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सतीशकुमार सोळुंके यांनी अध्यक्ष स्थान भूषविले तर प्रमुख पाहुणे अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉं नागेश चव्हाण, अधिसेविका डॉ. रमा गिरी सहाय्यक अधिसेविका, संगीता महानवार, डॉ पल्लवी पंडित, समाजसेविका सुनीता मिसाळ उपप्राचार्य उपस्थित होते.

कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. बाबासाहेब यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून तथागत भगवान बुद्ध यांच्या चरणी पुष्प अर्पण केले. बुद्धवंदना घेण्यात आली छोट्या मुलींनी नृत्य सादर केली तसेच विद्यार्थिनींनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विविध कार्यावर गौरवास्पद भाषणे केली. अध्यक्षीय भाषणात जिल्हा शल्य चिकित्सक यांनी सांगितले तुमच्याकडे ज्ञान आणि कर्तृत्व असेल तर जातं पात कोणी बघत नाही विद्यार्थीनिनो तुम्ही उद्याचे भविष्य आहात नवीन टेकॉनॉलॉजीचा वापर आपल्या ज्ञानात भर घालण्यासाठी करा, महापुरुषांनी स्त्रीयांना रूढी परपरेतून मुक्त करण्यासाठी महान कार्य केले, त्यांचे हक्क आणि अधिकार त्यांना मिळालेच पाहिजे. आपण रुग्णांसाठी काम करतो, सेवा करण्याची चांगली संधी



मिळालेली आहे. चांगली रुग्ण सेवा देण्याचा प्रयत्न केला पाहिजे, रुग्ण सेवा हीच खरी ईश्वर सेवा आहे. आपण समाजाच्या उपयोगी पडले पाहिजे, आपला खारीचा वाटा उचलला पाहिजे. यानंतर अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ नागेश चव्हाण यांनी विद्यार्थीनींना डॉ बाबासाहेब यांनी महिलांना हक्क व अधिकार दिलेत संविधानात महिलांसाठी सुरक्षा कवच हिंदू कोड बिल आणून त्यांना सशक्त व सुरक्षित करण्याच काम केले. डॉ रमा गिरी अधिसेविका यांनी डॉ बाबासाहेब यांच्या जीवनातील संघर्षमय जिवनावर प्रकाश टाकला. या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहूण्या डॉ. पल्लवी पंडित यांच्या समाजकार्यामुळे त्यांचा गौरव करण्यात आला. तसेच जुली रेड्डी अधीपरिचारिका यांच्या मुलाच्या स्मृतिप्रित्यर्थ मागील तीन वर्षात रक्तदान शिबीर घेण्यात आले त्यात १४० च्या जवळपास मुलांनी रक्तदान केलें म्हणून त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला नर्सिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी व शिक्षकवर्ग उपस्थित होते. मुक्ता पवार, प्रतीक जोशी, अजय ढाकणे व इन्चार्ज सिस्टर रंजना दाणे, संगीता जोगदंड, कांबळे सुनंदा, सीमा दुबे, उबाळे, आम्रपाली बनसोडे, सुनीता सोनवणे, शीला मुंडे, परिचारिका संघटनेच्या अध्यक्षा तसेच रेखा वनवे, वीणा करंदीकर, उल्का साळवे, सोनाली कांबळे, रेणुका वाघ, रेखा थोरात व कार्यालयातील अधिकारी सुपेकर हजर होतें सूत्रसंचलन श्रीपाल ससाणे यांनी केले तर आभारप्रदर्शन सुनीता पाटील यांनी केलें फॉउंडेशनचे पदाधिकारी चंद्रकला सुतार, नयना नरहिरे, प्रशांत सुकाळे, बापू निकाळजे, स्नेहा बचूटे, रवी साठे, रेश्मा कांबळे, अनिता धनवे, मुंजा पानझडे, किशोर बिरलीगे, सविता बेंद्रे, प्रतिभा औसरमल, कविता वाव्हळ, रोडे सुनीता, मुने अल्का, रेणुका, शाहीन शेख सायरा शेख, रेखा पवळे,

# महेश सेवा संघ व समस्त राजस्थानी परिवाराच्या वतीने भव्य जम्मा जागरण कार्यक्रमाचे आयोजन

बीड प्रतिनिधी

अक्षय्य तृतीयेच्या शुभमुहुर्तावर रविवार दिनांक १९ एप्रिल रोजी महेश सेवा संघ, बीड आणि सकल राजस्थानी समाज बीड यांच्या वतीने आराध्यदैवत बाबा रामदेवजी यांच्या जम्मा जागरण कार्यक्रमाचे भव्य स्वरूपात आयोजन करण्यात आले आहे.

हैद्राबाद येथील प्रख्यात भजनसम्राट श्री. अनिरुध्द जी दुनिवाले यांच्या सुमधुर वाणीतून हा कार्यक्रम आयोजित होणार आहे.

हा कार्यक्रम माँ वैष्णो पॅलेस बीड येथे संपन्न होणार आहे. रविवारी सायंकाळी ६:३० ते रात्री ८ ही सर्वांसाठी महाप्रसाद ची वेळ तर जम्मा जागरण रात्री ८ वाजल्यापासून सुरू होणार आहे.या कार्यक्रमासाठी जिल्हाभरातून राजस्थानी समाज एकत्रित येणार असून भव्य - दिव्य नियोजनाची कमान महेश सेवा संघाचे सर्व सदस्य आणि राजस्थानी समाजातील सर्व सामाजिक मंडळाच्या पदाधिकारी व सदस्यांनी घेतली आहे.या कार्यक्रमासाठी राजस्थानी समाजातील बांधवांनी तसेच रामदेव बाबांच्या भक्तांनी सहपरिवार अवश्य उपस्थित रहावे असे आवाहन मंडळाचे अध्यक्ष डॉ.संकेत बाहेती ,सचिव श्री.आनंद बाहेती या सह सर्व पदाधिकारी आणि सदस्यांनी केले आहे.



# तुलसी महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त अभिवादन

बीड (प्रतिनिधी): येथील देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयात भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्त आयोजित कार्यक्रमात महामानवाच्या विचारांना उजाळा देत त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी महाविद्यालयाचे प्राचार्य डी.जी निकाळजे, प्रा. अर्जुन राठोड यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या अभिवादन सोहळ्याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व विभागांचे प्राध्यापक, प्रशासकीय अधिकारी आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सर्वांनी पुष्प अर्पण करून महामानवाच्या स्मृतीस वंदन केले.

## पान १ वरून...

**भ्रष्ट कारभाराचे वाभाडे ...**

संहिता १९६६ च्या कलम २५७ अन्वये कारवाई करत जिल्हाधिकाऱ्यांनी तहसीलदारांचा तो वादग्रस्त आदेश रद्दबातल ठरवला आहे.

कारवाईचा दणका आता पुढे काय ?

नोंदी होणार रद्द बेकायदेशीर आदेशाच्या आधारे पाडण्यात आलेले फेरफार नोंद क्र. २९९५ आणि ३००४ यांची वैधता तपासून त्या तातडीने रद्द करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

शिस्तभंग कारवाई तत्कालीन तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्याविरुद्ध महाराष्ट्र नागरी सेवा शिस्त व अपील नियम १९७९ नुसार कडक विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे. चौकशीचा घेरा आवळला उपविभागीय अधिकारी श्री. उमाकांत पारधी यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली असून त्यांना अवघ्या आठ दिवसांत अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.सर्व संशयास्पद फायलींची झाडाझडती शेळके यांच्या कार्यकाळातील केवळ ही एकच जमीन नाही तर इतर सर्व संशयास्पद फायली आणि अभिलेख पुन्हा तपासले जाणार आहेत.यामुळे अनेक मोठे मासे गळाला लागण्याची शक्यता आहे.

जनतेत समाधानाचे वातावरण

तक्रारदारांनी प्रशासनातील या अन्यायाविरुद्ध दिलेल्या लढ्यामुळे जमिनीची मूळ स्थिती वर्ग-२ पूर्ववत तर होईलच पण भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या मनमानीला चपराक बसली आहे. नियमापेक्षा कोणीही मोठा नाही असा संदेश या निमित्ताने जिल्हा प्रशासनाने दिला आहे. या कारवाईमुळे भविष्यात जमिनीचे परस्पर व्यवहार करणाऱ्या भूमाफियांचे आणि त्यांना साथ देणाऱ्या भ्रष्ट अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा ....**

खेदजनक असून जयंती उत्सवाला गालबोट लावणारी आहे.

आंबेडकरांच्या मिरवणुकी दरम्यान रस्त्यावर घाण पाणी सोडून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अवमान करणाऱ्या व रस्त्यावर बारीक चर,खडी टाकून आंबेडकरी अनुयायांना जखमी करण्यास कारणीभूत असलेल्या बांधकाम अभियंता किरण देशमुख, पाणी पुरवठा अभियंता प्रमोद माने व कर्मचारी यांना तात्काळ निलंबित करण्यात यावे. नसता बीड शहर रिपाइंच्या वतीने बीड नगर परिषदवर सोमवार दि. २० एप्रिल २०२६ रोजी तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. असा इशारा युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे, राजू जोगदंड, प्रभाकर चांदणे, संभाजी गायकवाड, कपिल साळवे, विष्णू जोगदंड, तुषार जाधव, सिद्धिक फारोखी, भैय्यासाहेब वाघमारे आदींनी केले.

**फरार असलेला ....**

घेत सदर आरोपी हा तेथुन भिंती वरुन उडीमारुन पळुन गेला सदर आरोपी हा वडवणी येथील त्याचे मुळ गावी सोन्नाखोटा येथे जात असल्याची माहीती मिळाले वरुन पथकाने त्यांचा पाठलाग करत तरे गावातील त्याचे नातेवाईकांचे गच्चीवर दबा धरुन बसलेला असतांना त्यास शिताफीने पकडण्यात आले. असुन सदर आरोपी वर यापुर्वी खुनाचा प्रयत्न, अवैद्य रित्या शस्त्र जवळ बाळगणे, माराहाण करणे, अवैद्य रित्या दारु विक्री करणे अशा स्वरुपाचे एकुण ०५ गुन्हे दाखल आहेत. सदर आरोपीस मा. न्यायालयात हजर करण्यात आले असुन दिनांक २०/०४/२०२६ पावेतो पोलीस कोठडी मंजुर केलेली असुन पुढील तपास सहा. पोलीस निरीक्षीक श्री. प्रितमकुमार पुजारी हे करीत आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक,श्री. सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग बीड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक, मारुती खेडकर, पोलीस उप निरीक्षक श्री. मन्सुर शहा, पोह/नितीन राठोड, पोह/अजित शिकेतोड, पोह/नितेश माने, पोअं/ शरद भारती, पोअं/दिपक भोजे, चालक पोअं/डोईफोडे सर्व पोलीस ठाणे

## पान १ वरून...

पेठ बीड यांनी केली असुन पुढील तपास चालु आहे.

**आ.सुरेश धस यांनी....**

आणि वाकी या तीन बंधाऱ्यांमध्ये पाणी साठवून शेती सिंचनासाठी तातडीने पाणी सोडण्याची मागणी केली होती. या मागणीची त्वरित दखल घेत प्रशासनाने सकारात्मक प्रतिसाद देत आवश्यक ती कार्यवाही पूर्ण केली. प्रत्यक्ष उजव्या कालव्यातून पाणी सोडण्यात आल्याने लाभ क्षेत्रातील पिकांना मोठा आधार मिळणार असून, जनावरांच्या पाण्याचाही प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे.

या पार्श्वभूमीवर स्थानिक ग्रामस्थ आणि शेतकरी यांनी आमदार सुरेश धस यांच्या प्रयत्नांचे कौतुक करत त्यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले. योग्य वेळी पाणी मिळाल्यामुळे आमची मोठी चिंता दूर झाली अशा भावना ग्रामस्थांकडून व्यक्त करण्यात आल्या.

याबाबत आमदार सुरेश धस यांनी सांगितले की, शेतकऱ्यांच्या अडचणी सोडवणे हे माझे कर्तव्य आहे. भविष्यातही त्यांच्या प्रश्नांसाठी सातत्याने पाठपुरावा करत राहणार आहे. दरम्यान प्रशासनाकडूनही या भागातील पाणीपुरवठा सुरळीत व नियोजनबद्ध ठेवण्यासाठी विशेष लक्ष दिले जाणार असल्याचे सांगण्यात आले.

**पात्रुड-लोणगाव...**

स्थानिक नागरिकांच्या मते, या रस्त्याची अनेक वर्षांपासून दुरुस्ती झालेली नाही. काही ठिकाणी तात्पुरती खडी टाकून दुरुस्ती करण्याचा प्रयत्न केला गेला, मात्र तोही फार काळ टिकला नाही. परिणामी रस्त्याची अवस्था दिवसेंदिवस अधिकच बिकट होत चालली आहे. या मार्गावरून विद्यार्थ्यांना शाळा व महाविद्यालयात जाण्यासाठी तसेच शेतकऱ्यांना शेतीमाल बाजारात नेण्यासाठी मोठ्या प्रमाणात अडचणी येत आहेत.

वाहनधारकांचे म्हणणे आहे की, खराब रस्त्यामुळे वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असून दुरुस्तीचा खर्च वाढत आहे. तसेच वेळेचा अपव्ययही मोठ्या प्रमाणात होत आहे. काही ठिकाणी रस्त्यावर धूळ उडत असल्यामुळे परिसरातील नागरिकांच्या आरोग्यावरही परिणाम होत असल्याची तक्रार करण्यात येत आहे.

स्थानिक ग्रामस्थांनी अनेक वेळा सार्वजनिक बांधकाम विभागाकडे या रस्त्याच्या दुरुस्तीची मागणी केली आहे. मात्र अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये नाराजीचा सूर वाढत आहे. लोकप्रतिनिधींनी देखील या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देऊन संबंधित विभागाला तातडीने निर्देश द्यावेत, अशी मागणी होत आहे.

दरम्यान, या रस्त्याची तात्काळ डांबरीकरणासह कायमस्वरूपी दुरुस्ती करण्यात यावी, तसेच खड्डे बुजवून वाहतुकीसाठी सुरक्षित मार्ग उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे. अन्यथा येत्या काळात आंदोलनाचा इशारा देखील ग्रामस्थांनी दिला आहे.

एकूणच, पात्रुड ते लोणगाव हा महत्त्वाचा रस्ता सध्या जीवघेणा ठरत असून संबंधित यंत्रणांनी तातडीने दखल घेऊन रस्त्याची सुधारणा करणे अत्यावश्यक झाले आहे.


**केंद्रीय मुख्याध्यापक....**

कल्याण महासंघ,एकता फाउंडेशन,सिंदफणा गौरव आदर्श शिक्षक पुरस्काराने देखील सन्मानित करण्यात आले आहे.अध्यापनाशिवाय शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी वृक्षारोपण,शालेय विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी विविध प्रकारच्या स्पर्धा तसेच सामाजिक दृष्टीने आवश्यक असणारे कुटूंब नियोजन,ग्रामस्वच्छता,पालक विद्यार्थी मेळावे घेऊन सुसंवाद साधण्याचे काम केले आहे.त्यांनी घडविलेले विद्यार्थी विविध क्षेत्रात काम करत आहेत.उपशिक्षणाधिकारी जमीर शेख,गटशिक्षणाधिकारी प्रशांत शिंदे,आदर्श शिक्षक लखुळ मुळे,संभाजी सोनवणे,शाहिर अनिल तिवारी,शिवचरित्रकार कैलास तुपे यांच्या मार्गदर्शनाखाली गोरक्ष खेडकर यांनी आपली सेवा चांगल्या प्रकारे बजावली आहे.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या संविधानावर देश चालतो हि बाबासाहेबांची महानता - डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड

केज/प्रतिनिधी

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या व सर्वांना समान अधिकार एक व्यक्ती एकच मताची तरतूद घटनेत केलेल्या याच घटनेवर देश चालतो हि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची महानता आहे असे प्रतिपादन डॉ. वसुदेव बप्पा



गायकवाड यांनी केले.स्वानंद सार्वजनिक वाचनालय, आनंदगांव ता.केज जि. बीड येचे १४ एप्रिल २०२६ रोजी आयोजित भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त आयोजित ग्रंथप्रदर्शन, व्याख्यान,वक्तृत्व स्पर्धा, कथाकथन स्पर्धा, रंगभरण स्पर्धा,ग्रंथवाचन आदी कार्यक्रम घेण्यात आले.अध्यक्षस्थानी ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष,जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाजसेवक, महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध वक्ते व परखड व्याख्याते डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड हे होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोप प्रसंगी डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड बोलत होते.सर्वप्रथम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पन करून पुजन व वंदन करण्यात आले.

त्यानंतर एस.के.वैरागे, माजी सरपंच रामराजे गायकवाड,ग्रंथालयाचे आनंद भैय्या गायकवाड यांची थोडक्यात व्याख्याने झाली.त्यानंतर ग्रंथवाचन घेण्यात आले. ऋषीकेश गायकवाड, सुशांत सौदागर,बालाजी टिंगरे,यशवंत सौदागर यांनी ग्रंथवाचन केले. रंगभरण स्पर्धेत यशवंत सौदागर,सुशांत सौदागर, बालाजी टिंगरे यांनी विशेष प्राविण्य मिळविले

वक्तृत्व स्पर्धेत यशवंत सौदागर,सुशांत सौदागर, बालाजी टिंगरे यांनी विशेष प्राविण्य मिळविले,कथाकथन स्पर्धेत यशवंत सौदागर, बालाजी टिंगरे,सुशांत सौदागर यांनी विशेष प्राविण्य मिळविले.ग्रंथ प्रदर्शनात दादासाहेब गायकवाड,ए.बी. गायकवाड,प्रकाश गायकवाड,बाळासाहेब गायकवाड,आनंद भैय्या गायकवाड,शिवम गायकवाड,माऊली कदम,माजी सरपंच शिवाजीराव गायकवाड यांच्यासह मोठया संख्येने विद्यार्थी,वाचक सहभागी झाले.सर्व स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीस वितरण माजी सरपंच शिवाजीराव गायकवाड व डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले.

शिवाजीराव गायकवाड यांनी मार्गदर्शन केले. सकाळी ८ ते रात्री ५ पर्यंत ग्रंथप्रदर्शन चालले. शेवटी अध्यक्षीय समारोप डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केला.

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन

लातूर प्रतिनिधी

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत १४ ते २० एप्रिल, २०२६ या कालावधीत राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये संविधानिक मुल्ये, सामाजिक न्याय, समता व बंधुता या विषयी जागरुकता निर्माण करणे हा आहे. स्पर्धेत सहभागी हूण्यासाठी हींींिं://षेंीी.सश्रश/ ठलत्रझहलणसध८द४झ२छढ८ या लिंकवर निबंध अपलोड करावेत, असे आवाहन लातूर येथील जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी औताडे पी. जे. आणि कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन अधिकारी गिरीश महामुनी यांनी केले आहे.

गट - १ साठी आयटीआय, डिप्लोमा, बायफोकल, एसीव्हीसी विद्यार्थ्यांसाठी शब्दमर्यादा ५०० ते ८०० शब्द असणार आहे. गट -२ साठी पुरुष, महिलांसाठी खुला गट शब्दमर्यादा ८०० ते १२०० शब्द असणार आहे. या दोन्ही गटांसाठी १४ ते २० एप्रिल, २०२६ या कालावधीमध्ये निबंध सादरीकरण निबंध पीडीएफ (हस्तलिखीत किंवा टंकलेखित) स्वरुपात सोबत दिलेल्या लिंकवर अपलोड करणे आवश्यक आहे.

दोन्ही गटातील प्रथम पारितोषिक ३१ हजार रुपये व स्मृतीचिन्ह, सन्मानपत्र, द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक २१ हजार रुपये व स्मृतीचिन्ह, सन्मानपत्र, तृतीय क्रमांकाचे पारितोषिक ११ हजार रुपये व स्मृतीचिन्ह, सन्मानपत्र अशा स्वरुपाचे राहील. निबंध मराठी भाषेतच लिहिणे अनिवार्य आहे. मूळ (ओरिजनल) निबंध असावा. निबंधाची कॉपी आढळल्यास स्पर्धक अपात्र ठरेल. प्रत्येक स्पर्धकाने एकच निबंध सादर करावा व मजकूर शिष्ट आणि सुसंस्कृत असावा. निबंध हस्तलिखित किंवा टंकलिखित स्वरुपात स्वीकारला जाईल. मात्र अंतिम सादरीकरण पीडीएफ स्वरुपातच करणे आवश्यक आहे. निबंध टंकलिखित (टाईप) करुन करुन किंवा हस्तलिखित निबंध स्कॅन करुन हींींि://षेंीी.सश्रश/ ठलत्रझहलणसध८द४झ२छढ८ या लिंकवर अपलोड करावा.

स्पर्धकांनी पूर्ण नाव, गट क्रमांक, संपर्क क्रमांक शाळा, महाविद्यालयाचे नांव व संपूर्ण पत्ता आदी माहिती भरणे आवश्यक आहे. या स्पर्धेमध्ये सहभागी सर्व सहभागी स्पर्धकांना डिजिटल प्रमाणपत्र दिले जाईल. या स्पर्धेबाबत अधिक माहितीसाठी ९१५२२३०१९३ या व्हॉट्सअप क्रमांवर संपर्क करावा.

# जि.प. शिक्षक विकास घोडके सर यांना अमरसिंह पंडित यांच्या हस्ते 'प्रेरणास्तंभ' पुरस्कार प्रदान



गेवराई प्रतिनिधी

कास्ट्राइब कर्मचारी कल्याण महासंघातर्फे दरवर्षी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीचे औचित्य साधून दिले जाणारे मानाचे 'प्रेरणास्तंभ' आणि 'कृतज्ञता सन्मान' पुरस्कार नुकतेच प्रदान करण्यात आले. या मध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, नंदपूर येथील उपक्रमशील शिक्षक विकास भिकचंद घोडके यांना त्यांच्या शिक्षण क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल 'प्रेरणास्तंभ पुरस्कारा' ने सन्मानित करण्यात आले.राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस आदरणीय अमरसिंह पंडित यांच्या शुभहस्ते आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा उत्साहात पार पडला.

कास्ट्राइब कर्मचारी कल्याण महासंघाचे केंद्रीय अतिरिक्त सचिव बापूसाहेब ससाणे यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षी या पुरस्कारांचे आयोजन केले जाते. समाजात आदर्श काम करणाऱ्या व्यक्तींना आणि विशेषतः शिक्षण क्षेत्रात मोलाचे योगदान देणाऱ्या शिक्षकांना प्रोत्साहन देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. याही वर्षी अमरसिंह पंडित यांनी आपली उपस्थिती दर्शवून पुरस्कारार्थींचा गौरव केला.

या गौरव सोहळ्याला तालुक्यातील विविध क्षेत्रांतील पदाधिकारी, शासकीय कर्मचारी आणि शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रामुख्याने:

खेर्डावाडी केंद्र: केंद्रप्रमुख सवासे सर, केंद्र मुख्याध्यापक पवार सर, विश्वभूषण सोनवणे सर आणि केंद्रातील सर्व शिक्षक.विकास घोडके सरांना मिळालेल्या या पुरस्कारामुळे नंदपूर आणि पाडळसिंगी ग्रामस्थ, शिक्षक वर्ग, नातेवाईक आणि मित्रमंडळींनी त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला आहे.नंदपुर गावातील उपसरपंच शेख फत्तु मामु,भाजपा अल्पसंख्याक तालुका उपाध्यक्ष शेख बंन्नुपटेल ,शेख तैमुर,शेख वाहेद,यांनी पुरस्कार मिळाल्याबद्दल घोडके सरांचे अभिनंदन केले.

पुरस्काराला उत्तर देताना घोडके सर म्हणाले की, हा सन्मान माझ्या एकट्याचा नसून माझ्या शाळेतील विद्यार्थी, सहकारी आणि मला साथ देणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचा आहे. त्यांनी या निवडीबद्दल संयोजक समिती, उपस्थित मान्यवर, खेर्डावाडी केंद्रातील सहकारी आणि ग्रामस्थांचे मनापासून आभार व्यक्त केले.

नारी शक्ती वंदन अधिनियम हा केवळ एक कायदा नसून महिलांच्या सक्षमीकरणाचा नवा अध्याय म्हणून

# लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदिजींचे मनपूर्वक आभार - सुवर्णाताई लांबरुड

बीड प्रतिनिधी

नारी शक्ती वंदन अधिनियम हा केवळ एक कायदा नसून महिलांच्या सन्मान, समानता आणि सक्षमीकरणाचा नवा अध्याय आहे. मातृशक्तीवरील विश्वासातून भारत अधिक सक्षम, समताधिष्ठित आणि प्रगत राष्ट्र म्हणून पुढे जाईल, यात शंका नाही. यासाठी नरेंद्रजी मोदी यांचे मनःपूर्वक आभार आहेत असे मत महिला जिल्हाध्यक्षा सुवर्णाताई लांबरूड यांनी व्यक्त केले.

प्रदेश भाजपा, लोकनेत्या ना. पंकजाताई मुंडे, माजी खा. डॉ. प्रितमताई मुंडे यांच्या सुचनेनुसार व भाजपा जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली, महिला जिल्हाध्यक्षा सुवर्णाताई लांबरुड, जिल्हा उपाध्यक्ष




नवनाथ आण्णा शिराळे यांच्या उपस्थितीत नारी शक्ती वंदन कार्यक्रमा निमित्त भारतीय जनता पार्टी बीड जिल्हा महिला मोर्चा / आघाडीच्या वतीने स्वाक्षरी मोहीम, प्रभात फेरीसह मोदिजींना धन्यवाद देत राबविण्यात आले.

यावेळी मीराताई गांधले, ड. संध्याताई राजपूत, ड. भाग्यश्रीताई ढाकणे, ड. संगीताताई धसे, प्रीतताई कुकडेजा, संध्याताई मिश्रा, रुक्मिणीताई शिराळे, शालिनी परदेशी, लताताई राऊत, कल्पनाताई अहिरे, वच्छला काळे,



# बहुजन जेष्ठ नागरिक मंच केजच्या वतीने एक्कागार्ड पाणपोईचे उदघाट्न संपन्न

केज/प्रतिनिधी

बहुजन क्रांती मोर्चा व झोपडपट्टी हक्क संघर्ष समिती,तसेच बहुजन जेष्ठ नागरिक मंच,केज यांच्या वतीने गेल्या तीन वर्षापासुन केज शहरात महात्मा ज्योतिबा फुले, महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर,व सत्यशोधक अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त बाबुराव गालफाडे सर यांच्या मार्गदर्शनाखाली इरफान पठाण,अनिल लोखंडे, अजय गालफाडे,वैजनाथ क्षिरसागर,शहाजी जाधव सर,दगडू तात्या गालफाडे,सिताराम वैरागे,अमोल मस्के, बाळासाहेब गालफाडे, भिमराव हजारे,मनोहर गालफाडे,गंपू मस्के, दासराव कसबे,अर्जुन शिंदे इत्यादी युवा कार्यकर्ते यांनी सहकार्य केले आहे.या पाणपोईचे उद्धाटन केज नगर पंचायतच्या नगराध्यक्षा डॉ.सौ.सिताताई बनसोड तसेच जनविकास फाउंडेशन चे प्रमुख हारुणभाई इनामदार यांच्या हस्ते संपन्न झाले यावेळी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.पाणपोई चालू केल्याबद्दल नगराध्यक्षा डॉ.सौ.सिताताई बनसोड यांनी या उपक्रमाचे कौतुक केले आहे.व धन्यवाद दिले आहेत.




# बीएसएनएल कार्यालयात महापुरुषांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम उत्साहात

बीड/प्रतिनिधी

शहरातील बीएसएनएल कार्यालयामध्ये छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमादरम्यान उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी महापुरुषांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले.यावेळी प्रमुख वक्ते म्हणून डॉ. प्रा. विक्रम धन्वे यांनी मार्गदर्शन करताना महापुरुषांच्या कार्याचा व विचारांचा आढावा घेतला. त्यांच्या विचारांची आजच्या समाजात किती गरज आहे, हे त्यांनी अधोरेखित केले. कार्यक्रमात होळकर दाम्पत्यांनी आपल्या कवितांद्वारे महापुरुषांना अभिवादन करत उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे अध्यक्ष सहाय्यक महाप्रबंधक श्री. विलास सुपेकर यांनी अध्यक्षस्थानावरून मार्गदर्शन केले. प्रमुख पाहुणे म्हणून पोकळे साहेब उपस्थित होते. प्रास्ताविकातून श्री. बी. एच. कांबळे यांनी कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट करून उपस्थितांचे स्वागत केले. सूत्रसंचालन श्री. राहुल सोनवणे यांनी प्रभावीपणे केले, तर अश्विन कुमार निकाळजे यांनी आभार प्रदर्शन करून कार्यक्रमाची सांगता केली.

या कार्यक्रमास बीएसएनएलचे अधिकारी, कर्मचारी तसेच मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे वातावरण प्रेरणादायी व उत्साहपूर्ण होते.

# घारी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त जनस्वराज्य फाउंडेशन, पुणे तर्फे पुरस्कार वितरण सोहळा संपन्न



पुणे प्रतिनिधी

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त १४ एप्रिल २०२६ रोजी ध्येय जनस्वराज्याचे, मानवतेचे हक्काचे असे ब्रिदवाक्य असणारे जनस्वराज्य फाउंडेशन, पुणे यांच्याकडून विविध क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या मान्यवरांचा सन्मान केला जातो, असे जनस्वराज्य फाउंडेशनचे संचालक दशरथ उकिरडे यांनी सांगितले.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती जनसुराज्य फाउंडेशन महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या वतीने मौजे घारी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन जिल्हा कार्यवाह ऋषिकेश कुलकर्णी, सरपंच नंदकुमार काशीद, सूर्यकांत देशमुख, जनस्वराज्य फाउंडेशनचे संचालक दशरथ उकिरडे यांच्या हस्ते करण्यात आले.

ग्रामपंचायत कार्यालय, घारी येथे बार्शी तालुक्यातील अभिनेते दिग्दर्शक महादेव जाधवर यांनी चित्रपट क्षेत्रामध्ये सामाजिक, तसेच वेगवेगळे जनकल्याणाचे विषय घेऊन शॉर्ट फिल्म, लघु नाटिका, नाटक, वेबसिरीज यावर काम करत असल्याने तसेच सरपंच द पावर मॅन हा मराठी चित्रपट गावगाडा ग्रामविकास यावर आधारित आहे, लवकरच हा चित्रपट संपूर्ण महाराष्ट्रात प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे, त्यांचे या कार्यास प्रोत्साहन म्हणून भारतरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांचा मान्यवरांच्या हस्ते त्यांना कलारत्न पुरस्कार प्रदान करून सन्मान करण्यात आला.

त्याचबरोबर क्रीडा क्षेत्रात मोफत कार्य करणाऱ्या मनीषा लोकरे यांना क्रीडारत्न, तसेच स्नेहल विधाते यांना कलारत्न, ड. अक्षय पाटील व मेजर दत्तात्रय मोरे यांनाही पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीचे चेअरमन विजय गरड, जिल्हा परिषद सदस्य देवेंद्र डोके, पंचायत समिती सदस्य शरद बसवंत, सारंग जगदाळे, ग्रामसेवक दर्शन मंडलिक, समाजसेविका सुवर्णा शिवपुरे अश्विन गाढवे, राजाभाऊ वाघमारे, ड. मिलिंद बनसोडे, राधा घोंगणे, पूजा सातारकर, अबोली पालके भावना शहाणे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रफुल्ल भालशंकर यांनी केले आभार ड. मिलिंद बनसोडे यांनी मानले.

# मुस्लिम आरक्षणासाठी राष्ट्रवादीच्या नगरसेविका रेणुका संभाहरे सरसावल्या

गेवराई (प्रतिनिधी) : मुस्लिम समाजाच्या प्रलंबित आरक्षणाच्या मागणीसाठी १७ एप्रिल २०२६ रोजी आयोजित 'मुस्लिम आरक्षण एल्गार मेळाव्यास' राजकीय स्तरावरून मोठा पाठिंबा मिळत आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या नगरसेविका रेणुका शिवलिंग संभाहरे यांनी या मेळाव्याला लेखी पाठिंबा दर्शवला असून, मुस्लिम समाजाला आरक्षणाचे न्याय्य हक्क मिळणे ही सामाजिक समानतेसाठी



काळाची गरज असल्याचे प्रतिपादन केले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस, या पत्राद्वारे जाहीर करते की, मुस्लिम समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिक प्रगतीसाठी आरक्षणाची जी मागणी केली जात आहे, तिला माझा पूर्ण आणि सक्रिय पाठिंबा आहे. लोकशाहीच्या मार्गाने चाललेल्या या लढ्यात मुस्लिम बांधवांना त्यांचे घटनात्मक हक्क मिळावेत, ही माझी भूमिका आहे. आपल्या वतीने १७ एप्रिल २०२६ रोजी बीड येथे आयोजित करण्यात येणारा हा मेळावा यशस्वी व्हावा, हीच सदिच्छा. मी माझ्या समर्थकांसह या कार्यात आपल्या सोबत असेन.

नगरसेविका संभाहरे यांनी आयोजकांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे की, मुस्लिम समाजाची आर्थिक आणि शैक्षणिक स्थिती सुधारण्यासाठी आरक्षणाची अत्यंत गरज आहे. या आंदोलनात त्या स्वतः सहभागी होणार असून, समाजाच्या हक्कासाठी त्या खंबीरपणे उभ्या आहेत. या पाठिंब्यामुळे मेळाव्याची धार अधिक वाढली असून, मुस्लिम बांधवांनी त्यांचे आभार मानले आहेत.

# जीवन विकास शिक्षण मंडळ,केज संचलित स्व. विश्वंभर कोकिळ जीवन विकास व्याख्यानमालेचे आयोजन

शुभारंभ ह.भ.प.प्रणव महाराज पटवारी व ह.भ.प.केशव महाराज शास्त्री यांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलनाने होणार

केज/प्रतिनिधी

केज येथील जीवन विकास शिक्षण मंडळ संचलित स्व.विश्वंभर कोकिळ जीवन विकास व्याख्यानमालेचे दि.२० एप्रिल २०२६ ते दि.२६ एप्रिल २०२६ या कालावधीत स्वामी विवेकानंद विद्या मंदिर माध्यमिक विभाग या शाळेमध्ये सायंकाळी ७:०० ते ८:३० या वेळेच्या दरम्यान आयोजन करण्यात आले आहे.या व्याख्यानमालेने या वर्षी २६ व्या वर्षात पदार्पण केले आहे.ही व्याख्यानमाला श्रोत्यांच्या मनाला, बुध्दीला आणि आत्म्याला स्पंदित करुन स्फुर्ती,प्रेरणा,जिद्द, सामर्थ्य,उत्साह तसेच ध्येयांचे पर्व निर्माण करणारी ठरत आहे.तरी जास्तीत जास्त श्रोत्यांनी या व्याख्यानमालेचा लाभ घेण्याचे आवाहन जीवन विकास शिक्षण मंडळाचे संचालक, संयोजक व सर्व शिक्षक, प्राध्यापक वृंद यांनी केले आहे.यावर्षी व्याख्यान मालेचा शुभारंभ दि.२० एप्रिल २०२६ वार सोमवार रोजी माजलगाव येथील कवी, लेखक,प्रबोधनकार ह.भ.प.प्रणव महाराज पटवारी व केज येथील ह.भ.प.केशव महाराज



शास्त्री,भगवान श्रीकृष्ण आश्रम,बीड रोड केज यांच्या शुभहस्ते दिपप्रज्वलनाने होणार आहे.या दिवशी माजलगाव येथील कवी, लेखक,प्रबोधनकार, ह.भ.प.प्रणव महाराज पटवारी यांचे वर्तमान युगातील संतवाङ्मयाची प्रासंगिकता या विषया वर व्याख्यान होणार आहे.याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून ह.भ.प. केशव महाराज शास्त्री भगवान श्रीकृष्ण आश्रम बीड रोड केज हे उपस्थित राहणार आहेत.दि.२१एप्रिल रोजी प्रमुख व्याख्याते श्री. उदय देवळाणकर,शेती व पर्यावरण अभ्यासक, छत्रपती संभाजीनगर विषय- शेती आणि माती अध्यक्ष- रमाकांत कुलकर्णी ( बापू ) लेखक तथा जल अभ्यासक, लातूर.दि.२२ एप्रिल- प्रमुख व्याख्याते- डॉ. मधुश्री संजीव सावजी छत्रपती संभाजीनगर, अखिल भारतीय मंत्री, विद्याभारती अखिल भारतीय शिक्षा संस्थान विषय-महिला सक्षम असतातच..!अध्यक्षा- सौ.दिपाली काटे प्रवचनकार तथा ज्ञानेश्वरी अभ्यासक, रामकृष्ण परमहंस परिवार,केज दि.२३ एप्रिल- प्रमुख व्याख्याते- डॉ.राम जावळे,रोग प्रतिबंधन तज्ञ तथा जनरलसर्जन,जिजामाता आरोग्यालय,हॉस्पिटल लातूर,विषय आपले आरोग्य आपल्या हाती कसे घ्यावे ? अध्यक्ष- डॉ.दिनकर राऊत बालरोग तज्ञ,योगिता हॉस्पिटल केज दि.२४ एप्रिल- प्रमुख व्याख्याते- प्राचार्य सोमनाथ रोडे विभागीय अध्यक्ष, मराठवाडा जनता विकास परिषद,छत्रपती संभाजीनगर विषय- जाती तोडो भारत जोडो अध्यक्ष- दगडू दादा लोमटे कार्यकारिणी सदस्य,मराठवाडा साहित्य परिषद,छत्रपती संभाजीनगर दि.२५ एप्रिल- प्रमुख व्याख्याते- श्री.बापू सर्वगोड लेखक, दिग्दर्शक,चित्रपट प्रशिक्षक,मुंबई विषय- भारतीय चित्रपट सृष्टी : बदलती निर्मिती आणि प्रेक्षकांच्या अभिरुचीचा प्रवास अध्यक्ष- प्रविण जी देशपांडे संचालक, दि.वैद्यनाथ अर्बन को- ऑप बँक लि.परळी वैद्यनाथ,दि.२६ एप्रिल- प्रमुख व्याख्याते- श्री. विलास बडे सहसंपादक, न्यूज १८ मराठी मुंबई विषय- युद्धजन्य परिस्थितीत माध्यमांची भूमिका अध्यक्ष- सुहास सरदेशमुख विशेष प्रतिनिधी दै.लोकसत्ता, छत्रपती संभाजीनगर.

सदरील व्याख्यानमालेस जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन जीवन विकास शिक्षण मंडळ संस्थेचे संचालक मंडळ तसेच सर्व शिक्षक,प्राध्यापक व कर्मचारीवृंद,स्व.प्रमोद महाजन कनिष्ठ महाविद्यालय,स्वामी विवेकानंद विद्या मंदिर माध्यमिक,प्राथमिक, स्वयंअर्थसहाय्यित,स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कुल, केज जि.बीड यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# नायब तहसीलदार, पेशकार गायब, नागरिक त्रस्त! महसूल कार्यालयात कामाचा खोळंबा

महसूल कार्यालयात पेशकाराची खुर्ची रिकामी; कामासाठी आलेल्या नागरिकांचा संताप

गेवराई (प्रतिनिधी) स्थानिक महसूल कार्यालयात पेशकार कर्मचारी सतत गैरहजर राहत असल्याने नागरिकांची कामे खोळंबली आहेत. आज सकाळी १० वाजल्यापासून नागरिक कामासाठी रांगेत उभे होते, मात्र संबंधित कर्मचारी दुपारी १२ वाजेपर्यंत जागेवर हजर नसल्याने नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.




महसूल कामासाठी ग्रामीण भागातून येणाऱ्या शेतकऱ्यांना याचा मोठा फटका बसत आहे. आम्ही सकाळपासून कामासाठी आलो आहोत, पण कोणीही जबाबदार अधिकारी माहिती द्यायला तयार नाही, अशा भावना एका संतप्त नागरिकाने व्यक्त केल्या. प्रशासनाने अशा बेजबाबदार कर्मचाऱ्यांवर तात्काळ कारवाई करावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. कार्यालयातील या अनागोंदी कारभारावर वरिष्ठ अधिकारी काय भूमिका घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. स्थानिक तहसील कार्यालयातील महसूल विभागाचे नायब तहसीलदार सुभाष कट्टे,पेशकार कर्मचारी वारंवार गैरहजर राहत असल्यामुळे आज नागरिकांची मोठी धांदल उडाली. सकाळपासूनच कामासाठी आलेल्या शेतकरी आणि ग्रामस्थांना ताटकळत बसावे लागल्याने कार्यालयात संतापाचे वातावरण पाहायला मिळाले.

मिळालेल्या माहितीनुसार, आज महसूल कामांच्या अनेक फाईल्स प्रलंबित होत्या. मात्र, पेशकार त्यांच्या खुर्चीवर नसल्याने ही कामे पुढे सरकू शकली नाहीत. विशेषतः ग्रामीण भागातून भाड्याने गाडी करून आलेल्या नागरिकांचे आर्थिक नुकसान होत आहे. कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी सुद्धा याकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप यावेळी नागरिकांनी केला.

महाराष्ट्र महसूल विभागाने यापूर्वीच विनापरवाना गैरहजर राहणाऱ्या अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्याचे संकेत दिले आहेत. मात्र, स्थानिक पातळीवर या नियमांची पायमल्ली होत असल्याचे दिसत आहे. जर ही परिस्थिती लवकर सुधारली नाही, तर तीव्र आंदोलन करण्याचा इशारा उपस्थित नागरिकांनी दिला आहे.

# आयआयटी बॉम्बे येथे ७२० कोटी रुपयांची क्वांटम फॅब्रिकेशन सुविधा – माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड. आशिष शेलार

मुंबई प्रतिनिधी

प्रधानमंत्री नरेंद मोदी यांच्या नेतृत्वाखाली २०२३ मध्ये ६००० कोटी रुपयांच्या राष्ट्रीय क्वांटम मिशनची सुरुवात झाली. त्यामुळे देशाच्या क्वांटम क्षेत्रातील प्रगतीस मोठा वेग मिळाला. त्याचबरोबर, महाराष्ट्र शासनानेही या क्षेत्रात पुढाकार घेत 'महाराष्ट्र क्वांटम टेक्नॉलॉजी मिशन' सुरू केले असून, उद्योग-सिद्ध मनुष्यबळ तयार करण्यावर भर दिला जात आहे. त्यात आयआयटी बॉम्बे येथे ७२० कोटी रुपयांची क्वांटम फॅब्रिकेशन सुविधा उभारली जात असून, ही भारतातील पहिली फुल-स्टॅक क्वांटम हार्डवेअर प्रणाली ठरणार आहे. तसेच टाटा कन्स्ल्टन्सी सर्व्हिसेस आणि आयआयटी बॉम्बे यांच्या सहकार्याने देशातील पहिल्या क्वांटम डायमंड मायक्रोचिप इमेजरवर काम सुरू आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावरही काही कंपन्यांनी हजारो



किलोमीटर अंतरावर हॅक-प्रूफ क्वांटम कम्युनिकेशनमध्ये यश मिळवले आहे, अशी माहिती सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री ड.आशिष शेलार यांनी दिली.

जागतिक क्वांटम दिनानिमित्त मंत्रालयात आयोजित कार्यक्रमात माहिती तंत्रज्ञान मंत्री ड.आशिष शेलार यांनी क्वांटम तंत्रज्ञानाचे महत्त्व सांगून महाराष्ट्राला २०३० पर्यंत या क्षेत्रात जागतिक नेतृत्व मिळवण्याचे उद्दिष्ट ठेवण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमात मुख्य सचिव राजेश अग्रवाल, विभागाचे सचिव विरेंद्र सिंग, आयशर पुणे चे प्रो.उमाकांत रासोल, आयबीएम इंडियाचे संचालक अमित सिंघी, महाआयटीचे व्यवस्थापकीय संचालक संजय काटकर तसेच मंत्रालयातील अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव तसेच प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

क्वांटम तंत्रज्ञानामुळे संगणन, सुरक्षितता व संशोधन क्षेत्रात मोठे परिवर्तन – मुख्य सचिव राजेश अग्रवाल

क्वांटम तंत्रज्ञानामुळे संगणन, सायबर सुरक्षितता, औषधनिर्मिती आणि शेतीसारख्या विविध क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर परिवर्तन घडणार असून, महाराष्ट्र शासन या क्षेत्रात सक्रियपणे काम करत असल्याचे राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी सांगितले.

क्वांटम तंत्रज्ञानामुळे भविष्यातील प्रशासनात आमूलाग्र बदल – सचिव विरेंद्र सिंह

क्वांटम विज्ञान आता केवळ सैद्धांतिक किंवा प्रयोगशाळेपुरते मर्यादित राहिलेले नाही, तर ते प्रत्यक्ष जीवनातील उपयोगाकडे वेगाने वाटचाल करत आहे. संप्रेषण, आरोग्य, वित्त, ऊर्जा आणि विशेषतः राष्ट्रीय सुरक्षेसारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये क्वांटम तंत्रज्ञान परिवर्तन घडवू शकते. यामुळे प्रशासन, राष्ट्रीय सुरक्षा आणि विविध क्षेत्रांमध्ये मोठे परिवर्तन घडणार असल्याचे माहिती तंत्रज्ञान विभागाचे सचिव विरेंद्र सिंह यांनी सांगितले.

महाआयटीचे व्यवस्थापकीय संचालक संजय काटकर यांनी आभार प्रदर्शन केले.



# संघर्ष पत्रकार ग्रुप माजलगावकडून वाढदिवसानिमित्त ॲड. कसबे यांचा सत्कार

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव येथील उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयातील विधी अधिकारी डव्होकेट एस. एस. कसबे यांचा वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी संघर्ष पत्रकार ग्रुपच्या वतीने त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.या प्रसंगी अनंत घडसिंगे, सिद्धेश्वर गायकवाड पाटील, मच्छिंद्र उपाडे, फिरोज पठाण, विजय कापसे, युवा नेते कैलास गायकवाड, दादासाहेब फुलवरे, मुकुंद हिवाळे, विनायक रांजवन तसेच संदीप भिसे उपस्थित होते.सर्वांनी कसबे यांना पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा देत त्यांच्या कार्याचे कौतुक केले.

# सहारा कॉलनी मध्ये पहिल्यांदाच सर्व जातीधर्मीयाकडून भीम जयंती साजरी



धर्माबाद अशोक पडोळे

नगरपालिका कार्य कक्षेच्या इतिहासात पहिल्यांदाच सहारा कॉलनीमध्ये सर्व जाती धर्मीयाकडून भीम जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

विशेषतः सहारा कॉलनी मध्ये बौद्ध धर्मीय सोडून सर्वच अठरापगड जातीची भव्य दिव्य वसाहत आहे. पण यावर्षी पहिल्यांदाच राजेश्वर मुपडे पाटील व त्यांच्या सौभाग्यवती राजश्रीताई यांच्या नियोजनातून व परिश्रमातून त्यांच्या निवासस्थानच्या भव्य पटांगणात पहिल्यांदाच १३५ वी भीम जयंती साजरी करण्यात आली.यावेळी विधिवत पूजाविधी जी.पी.मिसाळे यांच्या हस्ते करण्यात आली. तर या कार्यक्रमास प्रमुख उपस्थितांमध्ये डॉ.लक्ष्मीनारायण केशटवार, गंगाधर ममोड अतकूरकर, शिवा पाटील, राकेश मंदावाड, प्रा. श्रीकांत मंदावाड, गंगरोड, कांतरेड्डी जारावार, उप्पोड, शंकर मंदावार,सौ.रामपुरे, सायलु कनकापूरे, माने, बालाजी पाटील सोनटक्के, डॉ.प्रणिता ममोड,भार्गव रेड्डी, बालाजी पेठेकर,महाराष्ट्र राज्याचा आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षक गंगाधरराव वाघमारे, सेवानिवृत्त बीट जमादार भगवानराव कदम, वस्तीग्रह अधीक्षक चंदर मिसाळे, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ .सुरेश देवे, किशनराव गोणेकर, दयानंद भेरजे, लक्ष्मीबाई कदम, अनुसया वाघमारे, वनिता मिसाळे यांच्यासह सहारा कॉलनीतील सर्वच घरातील सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डी.जी. गायकवाड यांनी केले. यावेळी पुढच्या वर्षी स्वतंत्र भीम जयंती मंडळ स्थापन करून मिरवणुकीमध्ये सहभागी होण्याचा मानस मुपडे दांपत्यांनी बोलून दाखवला. स्वातंत्र्यापासून अपेक्षित असलेल्या व सहारा कॉलनी मध्ये पहिल्यांदा सुरू झालेल्या भीम जयंती कार्यक्रमाची शहरात सकारात्मक चर्चा चालू आहे.

# पुस्तकी ज्ञानासोबतच उत्तम आरोग्याची कास धरा : डॉ. आदिती सारडांचे विद्यार्थ्यांना आवाहन

## जागतिक आरोग्य दिन : आदित्य शिक्षण संस्थेत उत्साह; २०० विद्यार्थ्यांची उपस्थिती



प्रतिनिधी । बीड

यशस्वी आयुष्यासाठी केवळ पुस्तकी अभ्यास पुरेसा नाही, तर शारीरिक आणि मानसिक आरोग्य सुदृढ असणे ही काळाची गरज आहे. विद्यार्थ्यांनी जीवनात यशस्वी होण्यासाठी अभ्यासासोबतच दैनंदिन जीवनात आरोग्याला प्राथमिक महत्त्व द्यावे, असे आवाहन आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांनी केले.

जागतिक आरोग्य दिनानिमित्त आदित्य शिक्षण संस्थेच्या वतीने संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष जनजागृती कार्यक्रम घेतला. आदित्य नर्सिंग शाखेच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. संस्थेच्या संकुलात हा सोहळा पार पडला. कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. आदिती सारडा यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर आदित्य आयुर्वेदिक शाखेचे प्राचार्य डॉ. विवेक कुलकर्णी, आदित्य नर्सिंग शाखे प्राचार्य विकास गर्जे आणि आदित्य शाखेचे प्राचार्य डॉ.राहुल खडके यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्राचार्य विकास गर्जे यांनी आरोग्य दिनाचे महत्त्व विशद केले. आरोग्यासाठी एकत्र विज्ञानाच्या पाठीशी उभे राहा हा संदेश देत त्यांनी विज्ञानाची साथ धरून आरोग्य जपण्याचे आवाहन केले. संस्थेच्या प्रगतीमध्ये आणि विद्यार्थ्यांच्या यशामध्ये डॉ. आदिती सारडा यांचे मार्गदर्शन नेहमीच प्रेरणादायी ठरत असल्याचे त्यांनी आवर्जून नमूद केले. डॉ. आदिती सारडा यांनी आपल्या मार्गदर्शनात विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधला. त्या म्हणाल्या की, आजच्या धावपळीच्या युगात आरोग्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. शिस्तबद्ध जीवनशैली आणि आरोग्याप्रती जागरूकता हीच यशाची पहिली पायरी आहे. सुमारे एक तास चाललेल्या या कार्यक्रमाला महाविद्यालयातील २०० हून अधिक विद्यार्थ्यांनी उपस्थिती लावली होती.

त्यामध्ये सीपीआर या विषयावर आदित्य नर्सिंग शाखेच्या साक्षी भोजने, निकीता घाडगे ,जयश्री भांगे, आरती कांबळे, गोकरना बडवने, अनुजा देवगुडे, हर्षदा वळवी यांनी मनोगत व्यक्त केले. त्यामध्ये सीपीआर या विषयावर पथनाट्य देखील सादर केले. त्यात विद्यार्थ्यांनी आणीबाणी मधे सीपीआर कसा द्यायचा यावर उत्कृष्ट प्रदर्शन केले.

पीकॉस या विषयावर नामदेव जाधव व सुहास भांडवलावर या विद्यार्थ्याने माहिती दिली. पीकॉस हा एक सामान्य स्त्रिरोग असून हार्मोन्स संतुलित नसल्याने हा आजार होतो त्यामुळे वंधत्व होऊ शकते. तसेच नियमित व्यायाम आणि योग्य आहार घेऊन आपण ते टाळु शकतो, त्यावर उपचार करू शकतो, असे विद्यार्थ्यांनी सांगत आरोग्य विषयी जागरूकता निर्माण केली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन प्राचार्य विकास गर्जे यांनी केले.

# ऐतिहासिक उत्साहात साजरी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती; सेवाभावी तंत्रज्ञ गजानन मुंडे यांचा भव्य सत्कार

माजलगाव प्रतिनिधी.. माजलगाव तालुक्यातील शुक्ल तीर्थ, लिमगाव येथे दि. १४ एप्रिल रोजी यांची १३५ वी जयंती अत्यंत उत्साहात व अभिमानाने साजरी करण्यात आली. गावातील नागरिकांनी एकत्र येत सामाजिक एकात्मतेचा संदेश देणारा हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पाडला.

यावेळी जयंतीनिमित्त एक विशेष उपक्रम राबविण्यात आला. गेल्या तीन ते चार वर्षांपासून दिवस-रात्र न थकता वीज सेवा देणारे महावितरणचे वरिष्ठ तंत्रज्ञ गजानन मुंडे यांचा ग्रामस्थांच्या वतीने भव्य सत्कार करण्यात आला. त्यांना स्मृतिचिन्ह, हार, शाल व श्रीफळ देऊन त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. त्यांच्या सेवेमुळे गावातील वीज समस्या मोठ्या प्रमाणात सुटल्याचे नागरिकांनी यावेळी सांगितले.

या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून सचिन उजगरे, गावाचे सरपंच कृष्णा थावरे तसेच ग्रामपंचायत सदस्य सिद्धार्थ पोळ, विवेक पोळ, वैभव वगरे, प्रकाश खडूळ, विष्णू शेरकर, मुंजा पांचाळ, नवनाथ आदमाने, नारायण पांचाळ, ओमप्रकाश गुंगेवाड यांच्यासह गावातील मित्रमंडळी व ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी डॉ. आंबेडकर यांच्या विचारांचे स्मरण करून समाजात शिक्षण, समानता व बंधुता यांचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच समाजासाठी प्रामाणिकपणे कार्य करणाऱ्या व्यक्तींचा



सन्मान करणे हीच खरी जयंती साजरी करण्याची पद्धत असल्याचे मत व्यक्त केले.

सत्कारामुळे भावूक झालेल्या गजानन मुंडे यांनी सर्व ग्रामस्थांचे मनःपूर्वक आभार मानत, भविष्यातही अशीच सेवा देण्याचा संकल्प व्यक्त केला. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

# जपानी मेंदूज्वराविरोधात महाराष्ट्र सतर्क

## लसीकरण मोहिमेला वेग –मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई प्रतिनिधी

जपानी मेंदूज्वरासारख्या संसर्गजन्य आजारावर प्रभावी नियंत्रण मिळवण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना, लसीकरण आणि जनजागृती यावर विशेष भर दिला जात आहे. जपानी मेंदूज्वर आजारावर नियंत्रण मिळवण्यासाठी राज्य शासन सतर्क असून लसीकरण मोहिमेला वेग देण्यात येत असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, नागरिकांच्या आरोग्याचे संरक्षण ही सरकारची सर्वोच्च प्राथमिकता आहे. सार्वजनिक आरोग्य यंत्रणांनी समन्वयाने काम करून या आजारावर प्रभावी नियंत्रण मिळवणे आवश्यक आहे. २०१५-१६ दरम्यान देशातील इतर राज्यांत जपानी मेंदूज्वरावरील लसीकरण मोहीम सुरू झाली होती. याच दरम्यान विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये जपानी मेंदूज्वराचे रुग्ण आढळले. मात्र, महाराष्ट्रात त्याची सुरुवात झाली नव्हती. ही बाब तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या लक्षात आली. त्यांनी त्यावेळी केंद्र सरकारला विशेष विनंती केली आणि जपानी मेंदूज्वर आजारांवरील लसीकरण मोहीमेला राज्यात सुरुवात केली. या प्रयत्नांमुळे आज रुग्णसंख्या जवळपास शून्यावर आली आहे.

जपानी मेंदूज्वराची वैशिष्ट्ये आणि धोका...

महाराष्ट्रात जपानी मेंदूज्वर या आजाराबाबत आरोग्य यंत्रणा सतर्क झाली असून लसीकरण व नियंत्रण उपाययोजनांना गती देण्यात आली आहे. हा आजार प्रामुख्याने डासांद्वारे पसरतो आणि मेंदूवर परिणाम करून गंभीर गुंतागुंत, झटके तसेच मृत्यू होण्याची शक्यता निर्माण करतो. या आजाराचा मृत्यूदर जास्त असून वाचलेल्या रुग्णांमध्ये न्यूरोलॉजिकल समस्या उद्भवू शकतात.

राज्यात २०२१ ते मार्च २०२६ या कालावधीत रुग्णसंख्या तुलनेने कमी असली तरी काही जिल्ह्यांमध्ये काही प्रकरणे आढळली आहेत. २०२२ मध्ये २ रुग्ण, २०२३ मध्ये ५ रुग्ण, २०२४ मध्ये ५ रुग्ण व २ मृत्यू, २०२५ मध्ये ७ रुग्ण व १ मृत्यू नोंदविण्यात आले, तर २०२६ च्या मार्चपर्यंत एकही रुग्ण आढळलेला नाही. नागपूर, भंडारा, चंद्रपूर आणि गडचिरोली या विदर्भातील जिल्ह्यांमध्ये प्रामुख्याने रुग्ण आढळले आहेत.

# गुरुनानक प्राथमिक विद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती साजरी



बीड/ प्रतिनिधी

श्री विठ्ठल गड शिक्षण प्रसारक मंडळ सारणी (सां.) ता. केज जि. बीड संचलित गुरुनानक प्राथमिक विद्यालयात भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर याची १३५ वी जयंती आनंदात आणि उत्साहात साजरी करण्यात आली. १४ एप्रिल रोजी विद्यार्थ्यांना सुट्टी असल्यामुळे विद्यार्थ्यांसाठी ही जयंती १३ एप्रिल रोजी साजरी करण्यात आली.

यावेळी शाळेचे मुख्याध्यापक श्रीमती पवार एस. ए.यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन केले तर श्रीमती डोंगरे यु. एम.यानी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन व कार्याबद्दल विद्यार्थ्यांना थोडक्यात माहिती सांगितली.१४ एप्रिल रोजी सकाळी शाळेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर याची जयंती साजरी करण्यात आली यावेळी श्री गदळे आर. ए. श्रीमती पवणे पी.एम. श्रीमती मुंडे एस. व्ही.श्री तांदळे ए. ए. श्री ठोकरे एम. व्ही. श्रीमती शेळके व शाळेच्या मुख्याध्यापक श्रीमती पवार एस. ए.उपस्थित होत्या.

# लातूर तालुक्यातील ममदापूर येथे १७ एप्रिल रोजी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर

लातूर प्रतिनिधी

महसूल विभागामार्फत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियानाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. या अभियानांतर्गत १७ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १० वाजता मौजे ममदापूर येथील दक्षिण मुखी हनुमान मंदिर मंगल कार्यालय, ममदापूर पाटी या ठिकाणी समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. तरी या शिबिरला जास्तीत जास्त नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन लातूरचे तहसीलदार सौदागर तांदळे यांनी केले आहे.

**कोर्ट,विद्यमान. श्री.रमेश पागोटे, तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, घनसावंगी यांचे न्यायालय, घनसावंगी .**
**रा.मा.क्रं. २७९ / जन्म-मृत्यू नोंद / २०२६**
**मौजे- रांजणी, तह. घनसावंगी, जि. जालना**

## -: जाहीरनामा :-

मौजे - रांजणी, तह. घनसावंगी, जि. जालना येथील सर्व नागरीकांना सुचित करण्यात येते की, अर्जदार श्री. अब्दुल अमीन शाह, राह. रांजणी, तह. घनसावंगी, जि. जालना यांनी या कार्यालयास अर्ज सादर केलेला असून यांनी त्यांचा मुलगा अजीम अब्दुल शाह याचा जन्म दि. १६/०९/२०११ रोजी मौजे - रांजणी येथे जन्माची नोंद घेण्यात आलेली नसल्याने नमुद करून ग्रामपंचायत रांजणी, ता. घनसावंगी, जि. जालना येथे जन्माचे प्रमाणपत्र नोंद करण्याकरीता आदेश मिळण्याबाबत अर्ज सादर केलेला आहे.

सदर अर्जदार यांना स्वतःच्या मुलाच्या जन्माचे प्रमाणपत्र नोंद आदेश देण्याबाबत कोणाला आक्षेप अथवा उजर घ्यावयाचे असतील त्यांनी पंधरा दिवसा पर्यंत आपले आक्षेप अथवा उजर तहसिल कार्यालय, घनसावंगी येथे कार्यालयीन वेळेत तक्रार लेखी स्वरुपात स्वतः उपस्थित राहून या कार्यालयात समक्ष सादर करावे. नियोजीत तारखेनंतर मिळालेल्या आक्षेपावर विचार करण्यात येणार नाही, याबाबत संबंधितांनी नोंद घ्यावी.

सदर जाहीरनामा आज दिनांक १५ / ४ / २०२६ रोजी माझे सही व शिक्क्यानीशी प्रसिध्द करण्यात येत आहे.

**स्वाक्षरीत/-**
**तालुका दंडाधिकारी, घनसावंगी**

**कोर्ट,विद्यमान. श्री.रमेश पागोटे, तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, घनसावंगी यांचे न्यायालय, घनसावंगी .**
**रा.मा.क्रं. / जन्म-मृत्यू नोंद/ २०२६**
**मौजे- रांजणी, तह. घनसावंगी, जि. जालना**

## -: जाहीरनामा :-

मौजे - रांजणी, तह. घनसावंगी, जि. जालना येथील सर्व नागरीकांना सुचित करण्यात येते की, अर्जदार श्रीमती शबाना रहीम शेख, राह. रांजणी, तह. घनसावंगी, जि. जालना यांनी या कार्यालयास अर्ज सादर केलेला असून यांनी स्वतःचे नावे शबाना रहीम शेख यांचा जन्म दि. २१/०३/१९७९ रोजी मौजे - रांजणी येथे जन्माची नोंद घेण्यात आलेली नसल्याने नमुद करून ग्रामपंचायत रांजणी, ता. घनसावंगी, जि. जालना येथे जन्माचे प्रमाणपत्र नोंद करण्याकरीता आदेश मिळण्याबाबत अर्ज सादर केलेला आहे.

सदर अर्जदार यांना स्वतःच्या नावाचे जन्माचे प्रमाणपत्र नोंद आदेश देण्याबाबत कोणाला आक्षेप अथवा उजर घ्यावयाचे असतील त्यांनी पंधरा दिवसा पर्यंत आपले आक्षेप अथवा उजर तहसिल कार्यालय, घनसावंगी येथे कार्यालयीन वेळेत तक्रार लेखी स्वरुपात स्वतः उपस्थित राहून या कार्यालयात समक्ष सादर करावे. नियोजीत तारखेनंतर मिळालेल्या आक्षेपावर विचार करण्यात येणार नाही, याबाबत संबंधितांनी नोंद घ्यावी.

सदर जाहीरनामा आज दिनांक १५ / ४/ २०२६ रोजी माझे सही व शिक्क्यानीशी प्रसिध्द करण्यात येत आहे.

**स्वाक्षरीत/-**
**तालुका दंडाधिकारी, घनसावंगी**

**कोर्ट,विद्यमान. श्री.रमेश पागोटे, तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, घनसावंगी यांचे न्यायालय, घनसावंगी .**
**रा.मा.क्रं. / जन्म-मृत्यू नोंद / २०२६**
**मौजे- रांजणी, तह. घनसावंगी, जि. जालना**

## -: जाहीरनामा :-

मौजे - रांजणी, तह. घनसावंगी, जि. जालना येथील सर्व नागरीकांना सुचित करण्यात येते की, अर्जदार श्री. शब्बीर अब्दुला शेख, राह. रांजणी, तह. घनसावंगी, जि. जालना यांनी या कार्यालयास अर्ज सादर केलेला असून यांनी स्वतःचे नावे शब्बीर अब्दुला शेख यांचा जन्म दि. ०१/०१/१९५४ रोजी मौजे - रांजणी येथे जन्माची नोंद घेण्यात आलेली नसल्याने नमुद करून ग्रामपंचायत रांजणी, ता. घनसावंगी, जि. जालना येथे जन्माचे प्रमाणपत्र नोंद करण्याकरीता आदेश मिळण्याबाबत अर्ज सादर केलेला आहे.

सदर अर्जदार यांना स्वतःच्या नावाचे जन्माचे प्रमाणपत्र नोंद आदेश देण्याबाबत कोणाला आक्षेप अथवा उजर घ्यावयाचे असतील त्यांनी पंधरा दिवसा पर्यंत आपले आक्षेप अथवा उजर तहसिल कार्यालय, घनसावंगी येथे कार्यालयीन वेळेत तक्रार लेखी स्वरुपात स्वतः उपस्थित राहून या कार्यालयात समक्ष सादर करावे. नियोजीत तारखेनंतर मिळालेल्या आक्षेपावर विचार करण्यात येणार नाही, याबाबत संबंधितांनी नोंद घ्यावी.

सदर जाहीरनामा आज दिनांक १५ / ४/ २०२६ रोजी माझे सही व शिक्क्यानीशी प्रसिध्द करण्यात येत आहे.

**स्वाक्षरीत/-**
**तालुका दंडाधिकारी, घनसावंगी**

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# येत्या पाच दिवसांत पोलिसांनी उमापूरच्या एसबीआय मॅनेजर भूपेंद्र लारोकरला अटक न केल्यास लोकशाही मार्गाने आमरण उपोषणाला बसणार!

## पत्रकार नवनाथ आडे यांचा थेट पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांना पाच दिवसांचा अल्टिमेटम



गेवराई, (प्रतिनिधी):- दिव्यांग पत्रकार नवनाथ आडे यांच्यावर झालेल्या अन्यायप्रकरणी आता न्यायाची मागणी अधिक तीव्र झाली आहे. दिनांक ०६ मार्च २०२६ रोजी चकलांबा पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ५८/२०२५, अपंग व्यक्ती अधिकार अधिनियम २०१६ च्या कलम ९२ अंतर्गत गुन्हा दाखल होऊनही अद्याप आरोपीला अटक न झाल्याने अजूनही पोलिसांच्या आवाक्याबाहेर असल्याने संताप व्यक्त होत आहे. सदर प्रकरणातील आरोपी भूपेंद्र लारोकर (वय ५०), हे स्टेट बँक ऑफ इंडिया, उमापूर शाखेचे व्यवस्थापक असून, त्यांनी दिव्यांग पत्रकार नवनाथ आडे यांच्याशी सार्वजनिक ठिकाणी अमानुष वर्तन केल्याचा गंभीर आरोप आहे. या घटनेमुळे पीडित पत्रकाराची मानसिक स्थिती ढासळल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

गुन्हा दाखल होऊन एक महिन्याहून अधिक कालावधी उलटून गेला असला, तरी पोलिसांनी अद्याप आरोपीला अटकेची प्रक्रिया केली नाही. मात्र आता या पार्श्वभूमीवर पोलिस प्रशासनाने कायदेशीर प्रक्रियेनुसार कार्यवाही करत लवकरात लवकर आरोपीला अटक करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. नवनाथ आडे यांनी या प्रकरणात पोलीस प्रशासनासोबतच एसबीआयच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडेही पाठपुरावा करत संबंधित व्यवस्थापकाला निलंबित करण्याची मागणी केली आहे. मात्र अद्याप ठोस निर्णय न झाल्याने त्यांनी आता अधिक ठाम भूमिका घेतली आहे.

यासंदर्भात त्यांनी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांच्याकडे लेखी निवेदन देत स्पष्ट इशारा दिला आहे की, पुढील ५ दिवसांत आरोपीला अटक करून योग्य कारवाई करण्यात यावी, अन्यथा उमापूर पोलीस चौकीसमोर लोकशाही मार्गाने आमरण उपोषणाला बसणार आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, दिव्यांग व्यक्तीच्या न्यायासाठी प्रशासन किती तत्परतेने कार्य करते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. नागरिकांमधूनही न्यायासाठी आवाज उठत असून, या प्रकरणात लवकरात लवकर ठोस निर्णय होणे गरजेचे असल्याची भावना व्यक्त होत आहे. जर वेळेत कारवाई झाली नाही, तर या प्रकरणाला मोठे आंदोलनाचे स्वरूप येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, कायद्यावर नागरिकांचा विश्वास कायम ठेवण्यासाठी अशा प्रकरणांमध्ये वेळेत आणि योग्य ती कारवाई होणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे आता सर्वांचे लक्ष पोलीस अधीक्षकांच्या पुढील पावलाकडे लागले असून, येत्या काही दिवसांत या प्रकरणाला निर्णायक वळण मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

मॅनेजरवर गंभीर गुन्हा दाखल असतानाही निलंबन का नाही?

दिव्यांग पत्रकार प्रकरणात संबंधित बँक मॅनेजरवर अपंग व्यक्ती अधिकार अधिनियम २०१६ च्या कलम ९२ अंतर्गत गंभीर गुन्हा दाखल असतानाही अद्याप कोणतीही अंतर्गत कारवाई न झाल्याने संताप व्यक्त होत आहे. इतक्या गंभीर आरोपांनंतरही संबंधित अधिकारी पदावर कायम ठेवले जाणे ही बाब चिंतेची ठरत आहे. सामान्य कर्मचाऱ्यांवर किरकोळ कारणांवरही तात्काळ निलंबनाची कारवाई केली जाते, मात्र या प्रकरणात मात्र वेगळीच भूमिका का घेतली जात आहे? असा सवाल नागरिकांमधून उपस्थित होत आहे. बँक प्रशासनाची ही भूमिका नेमकी कोणाच्या दबावाखाली आहे का, अशीही चर्चा रंगू लागली आहे.

या प्रकरणात पारदर्शकता राखत तात्काळ चौकशी करून संबंधित मॅनेजरला निलंबित करणे आवश्यक असल्याची मागणी जोर धरत आहे. अन्यथा प्रशासनावरील विश्वास डळमळीत होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. आता तरी संबंधित बँक प्रशासनाने जागे होऊन तात्काळ निर्णय घ्यावा, संबंधित मॅनेजरला निलंबित करावे अशी मागणी केली जात आहे.

पोलीस अधीक्षकांकडे लेखी तक्रार; अटक न झाल्यास आमरण उपोषणाचा इशारा

दिव्यांग पत्रकार नवनाथ आडे यांनी आपल्या प्रकरणात थेट पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांच्याकडे लेखी तक्रार दाखल करत न्यायासाठी धाव घेतली आहे. चकलांबा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होऊनही अद्याप आरोपीवर ठोस कारवाई न झाल्याने त्यांनी वरिष्ठ पातळीवर हस्तक्षेपाची मागणी केली आहे. तक्रारीत त्यांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, संबंधित आरोपीवर तात्काळ अटक कारवाई करण्यात यावी. तसेच प्रकरणाची गांभीर्याने चौकशी करून न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. या तक्रारीमुळे आता पोलीस प्रशासनासमोर जबाबदारी वाढली असून, आता पोलीस अधीक्षक कोणती भूमिका घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



## रोशनगावात डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात वृक्षारोपण,स्वच्छता व संविधान प्रतींचे वाटप

बदनापूर /प्रतिनिधी :- भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त रोशनगाव येथे विविध समाजोपयोगी उपक्रमांनी सजलेला उत्साहपूर्ण कार्यक्रम पार पडला.जयंतीनिमित्त वृक्षारोपण,स्वच्छता अभियान, भारतीय संविधानाच्या प्रतींचे वाटप तसेच मिठाई वितरण करण्यात येऊन सामाजिक बांधिलकीचा संदेश देण्यात आला.कार्यक्रमाची सुरुवात डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने झाली. यानंतर गावातील प्रमुख ठिकाणी स्वच्छता मोहीम राबवून परिसर स्वच्छतेचा संदेश देण्यात आला, तर वृक्षारोपणातून पर्यावरण संवर्धनाचा संकल्प करण्यात आला. उपस्थितांना संविधानाच्या प्रतींचे वाटप करून लोकशाही मूल्यांची जाणीव करून देण्यात आली.

जयंतीनिमित्त छत्रपती शिवाजी महाराज,माता अहिल्याबाई होळकर आणि संत रोहिदास महाराज यांच्या स्मारकांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या माध्यमातून महापुरुषांच्या विचारांचा जागर करून समाजाला प्रेरणा देण्याचा प्रयत्न करण्यात आला.

या कार्यक्रमाला सरपंच आणीस भाई पठाण,उपसरपंच कृष्णा भाऊ खरात,पोलीस पाटील संतोष दामोदर खरात यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य,स्थानिक नेतेमंडळी व ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. गावकऱ्यांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदवत जयंती सोहळा अधिक रंगतदार केला.

यावेळी सचिन गाडगे,विलास गाडगे,आकाश लिहिणार,गणेश गाडगे,अनिल सोनवणे,संजय गाडगे,अजय गाडगे,संदीप अंभोरे,राजू अकोदे,राम लखन गाडगे आदी कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

## दिवंगत नेते अजितदादा पवार यांच्या विमान दुर्घटनास्थळी मान्यवरांची साश्रू नयनांनी आदरांजली

आष्टी - (राजेंद्र लाड) राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि महाराष्ट्राच्या राजकारणातील एक धडाडीचे रोखठोक नेतृत्व दिवंगत अजितदादा पवार यांच्या दुर्दैवी विमान अपघात स्थळाला नुकतीच भेट देऊन त्यांना भावपूर्ण आदरांजली अर्पण करण्यात आली. दादांच्या अचानक जाण्याने संपूर्ण महाराष्ट्रावर जी शोककळा पसरली होती, त्या दुःखाच्या आणि सुन्नतेच्या छटा आजही या दुर्घटनास्थळी स्पष्टपणे जाणवत होत्या. एका ज्येष्ठ पत्रकाराच्या नात्याने या स्थळाला भेट देताना मन अत्यंत जड झाले होते. राज्याच्या कानाकोपऱ्यात विकासाची पाळेमुळे रुजवणारा हा नेता ज्या ठिकाणी अनंताच्या प्रवासाला निघून गेला, तेथील शांतता मनाला चटका लावणारी होती. या अत्यंत भावपूर्ण आणि दुःखद प्रसंगी दादांना श्रद्धांजली वाहण्यासाठी समाजातील विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

यामध्ये प्रामुख्याने सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक शेख अन्सारभाई, शिक्षण क्षेत्रातील प्रा. डॉ. जी. पी. बोडखे आणि इंजिनिअर पी. बी. बोडखे यांनी दुर्घटनास्थळी आपल्या लाडक्या नेत्याला साश्रू नयनांनी निरोप दिला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी दुर्घटनास्थळा वरील स्मृतींना पुष्प अर्पण करून दादांच्या कार्याचे स्मरण केले.

सेवानिवृत्त पीएसआय शेख अन्सार भाई यांनी दादांच्या प्रशासकीय वचक आणि गतिमान कार्यप्रणालीच्या आठवणींना उजाळा दिला. पोलिस प्रशासन असो वा सामान्य जनता, दादांचा निर्णय घेण्याचा वेग आणि त्यांची न्यायबुद्धी नेहमीच मार्गदर्शक राहिली, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. प्रा. डॉ. जी. पी. बोडखे आणि इंजि. पी.



बी. बोडखे यांनी अजित दादांच्या दूरदृष्टीमुळे आणि विकासाभिमुख राजकारणामुळे शैक्षणिक व पायाभूत सुविधांच्या क्षेत्राला मिळालेल्या गतीबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. दादांचे जाणे ही महाराष्ट्राच्या राजकीय आणि सामाजिक क्षेत्राची कधीही न भरून येणारी हानी आहे. पहाटेपासून सुरू होणारा त्यांचा कामाचा धडाका आणि स्पष्टवक्तेपणा यापुढे कायम स्मरणात राहील, अशी शोकसंवेदना यावेळी उपस्थितांनी व्यक्त केली. अपघातस्थळावरील ती स्तब्धता आणि उपस्थित मान्यवरांचे पाणावलेले डोळे, दादांनी जनमानसात मिळवलेल्या अफाट लोकप्रियतेची आणि त्यांच्या कर्तृत्वाची साक्ष देत होते. महाराष्ट्र आपल्या या लाडक्या सुपुत्राला कधीही विसरू शकणार नाही.

## धानोरा येथे तीन शिक्षकांचा सेवापूर्ती सोहळा उत्साहात;मान्यवरांच्या उपस्थितीत कार्याचा गौरव

आष्टी - (राजेंद्र लाड) आष्टी तालुक्यातील धानोरा येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील तीन अनुभवी व कर्तव्यदक्ष शिक्षकांचा सेवापूर्ती सोहळा सोमवार दिनांक १३ एप्रिल २०२६ रोजी अत्यंत उत्साहपूर्ण व भावनिक वातावरणात संपन्न झाला. या सोहळ्यात प्राचार्य श्री. शिवाजी मारुती ढोबळे, प्राध्यापिका श्रीमती सुनिता नामदेव बांदल आणि प्राध्यापक श्री. अजित आण्णासाहेब इथापे यांना सन्मानपूर्वक निरोप देण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विजयकुमार बांदल आण्णा होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी आमदार साहेबराव दरेकर, माजी आमदार बाळासाहेब आजबे, युवा नेते जयदत्त धस, मनोरंजन धस, अंकुश चव्हाण, परमेश्वर काका शेळके, राजू दहातोंडे आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली होती. कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवर, शिक्षकवृंद, माजी विद्यार्थी, पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनता वसतिगृह शिक्षण संस्थेअंतर्गत चालणाऱ्या या विद्यालयात कार्यरत असलेल्या या तिन्ही शिक्षकांनी अनेक वर्षे निष्ठा, प्रामाणिकपणा आणि समर्पणाच्या भावनेतून विद्यार्थ्यांना शिक्षण दिले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली घडलेले अनेक विद्यार्थी आज विविध क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करत समाजात आपली वेगळी ओळख निर्माण करत आहेत. त्यांच्या कार्यामुळे विद्यालयाची शैक्षणिक गुणवत्ता उंचावली असून, विद्यार्थ्यांमध्ये संस्कार व शिस्तीची जपणूक झाली आहे.

कार्यक्रमादरम्यान मान्यवरांनी आपल्या मनोगतातून या तिन्ही शिक्षकांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या सेवाभावी वृत्तीचे कौतुक केले. शिक्षक हे समाजाचे शिल्पकार असून त्यांच्या कार्यामुळेच सक्षम पिढी घडते, असे प्रतिपादन यावेळी वक्त्यांनी केले. यानंतर सर्व मान्यवरांच्या हस्ते शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन तिन्ही शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना निवृत्त शिक्षकांनी आपल्या सेवाकाळातील आठवणींना उजाळा देत



विद्यार्थ्यांप्रती कृतज्ञता व्यक्त केली व शिक्षण क्षेत्राशी आपले नाते कायम ठेवण्याचा संकल्प व्यक्त केला. या सोहळ्याला सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, साहित्य, कला, क्रीडा व आध्यात्मिक क्षेत्रातील अधिकारी, जिल्हा परिषद सदस्य तसेच विविध संस्थांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रम आनंददायी व भावनिक वातावरणात पार पडला.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त ससाणे दांपत्याचा मरणोत्तर देहदानाचा संकल्प

आष्टी - (राजेंद्र लाड) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त आष्टी तालुक्यातील धामणगाव येथील सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार संतोष ससाणे आणि त्यांची पत्नी शितल ससाणे या दांपत्याने मरणोत्तर देहदान करण्याचा स्तुत्य व प्रेरणादायी संकल्प करून बाबासाहेबांना अनोखे अभिवादन केले आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शोषित, पीडित, शूद्र-अतिशूद्र तसेच महिलांच्या उन्नतीसाठी केलेले कार्य अतुलनीय आहे. त्यांनी बहुजन समाजाला स्वाभिमानाने जगण्याचा अधिकार मिळवून दिला. आपल्या असामान्य बुद्धिमत्ता आणि परिश्रमांच्या जोरावर त्यांनी जगातील सर्वोत्तम संविधानिक लोकशाही व्यवस्था उभारली आणि सर्व नागरिकांना समान हक्क व अधिकार दिले. त्यांच्या या महान



कार्याची परतफेड करणे अशक्य असले तरी त्यांच्या विचारांवर चालणे हीच खरी कृतज्ञता असल्याचे मत व्यक्त होत आहे.

याच विचारांनी प्रेरित होऊन संतोष ससाणे व शितल ससाणे या दांपत्याने आयुष्यभर सामाजिक व धार्मिक कार्य करताना विज्ञाननिष्ठ बौद्ध धम्माचा प्रसार करण्याचा वसा घेतला आहे. त्यांनी आपल्या मृत्यूनंतर देह मातीमोल न ठरता वैद्यकीय शिक्षणासाठी उपयोगी पडावा, या उदात्त भावनेतून देहदानाचा निर्णय घेतला आहे.

यासाठी त्यांनी स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई येथे मरणोत्तर देहदानासाठी स्वेच्छेने अर्ज करून घोषणापत्र सादर केले. तसेच ग्रामीण रुग्णालय, आष्टी येथील वैद्यकीय अधिकाऱ्यांकडेही संबंधित कागदपत्रे सुपूर्द करण्यात आली. ससाणे दांपत्याचा हा निर्णय केवळ सामाजिक जाणीवेचा आदर्श नसून, बौद्ध धम्मातील दान पारमिता च्या तत्त्वाचेही उत्कृष्ट उदाहरण मानले जात आहे. त्यांच्या या कार्यामुळे समाजात देहदानाबाबत सकारात्मक संदेश जात असून अनेकांना प्रेरणा मिळत आहे.

या प्रसंगी आरोग्य अधिकारी डॉ. रामदास मोराळे, भीमजयंती उत्सव समिती अध्यक्ष सुनील शिंदे, ज्येष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्रबुद्धे, रिपाई नेते अरुण भैय्या निकाळजे, बौद्ध महासभा तालुका अध्यक्ष रत्नकांत निकाळजे, सरचिटणीस आकाश कांबळे, शहराध्यक्ष किशोर निकाळजे, विजय काळे, सुनील साळवे, युवा नेते कुणाल निकाळजे, समता सैनिक काळे आदी मान्यवर उपस्थित होते. ससाणे दांपत्याच्या या स्तुत्य निर्णयाचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून, त्यांच्या या उपक्रमामुळे समाजात मानवतेचा आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाचा संदेश अधिक बळकट होत आहे.

## शारदा मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलचे जातेगाव येथे मोफत आरोग्य तपासणी शिबीर

गेवराई (प्रतिनिधी) गेवराई येथील जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळ, संचलित शारदा मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल रिसर्च इन्स्टिट्युटच्या वतीने गुरुवार दिनांक १६ एप्रिल रोजी जातेगाव येथे मोफत आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले असून या शिबिरात इच्छुकांनी जास्तीत जास्त संख्येने सहभागी होण्याचे आवाहन हॉस्पिटलच्या वतीने करण्यात आले आहे.

सकाळी आठ ते दुपारी एक या वेळेत होणाऱ्या या शिबिरामध्ये दाताची आरोग्य तपासणी, महिलांची आरोग्य तपासणी, बालकाच्या आजाराची तपासणी, बी.पी/ शुगर तपासणी, रक्त व लघवी तपासणी करण्यात येणार असून गोळ्या व औषधी मोफत वाटप करण्यात येणार आहेत. शिबिरात इच्छुकांनी जास्तीत जास्त संख्येने सहभागी होण्याचे आवाहन हॉस्पिटलच्या वतीने करण्यात आले आहे



## विधुत कर्मचारी सहकारी पतसस्था मर्या ता . पाटोदा येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

पाटोदा ( प्रतिनधी ) येथील विद्युत कर्मचारी सहकारी मर्या . पतसंस्था पाटोदा येथे १४ एप्रिल रोजी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या वेळी कनिष्ठ अभियंता श्री आदेश कदम साहेब यांच्या हस्ते डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले

कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपस्तीत प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी संस्थेचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाला विद्युत कर्मचारी सहकारी पतसंस्था चे चेअरमन श्री सुनील वाघमारे, सचिव श्री प्रभु जाधवर साहेब, श्री सतीश गोरे, श्री सुरवसे साहेब, श्री चौरे साहेब, श्री वैभव नाईकनवरे साहेब, श्री जाधव साहेब, श्री दळवी साहेब, श्री गोपाळघरे साहेब, श्री अनपट साहेब, श्री हजारे साहेब, श्री धुमाळ साहेब, श्री किरण नाईक नवरे साहेब, श्री व्ही. टी. नाईकवाडे साहेब, श्री सोफियान पठाण साहेब, श्री शेख माजेद साहेब, श्री सादिक भाई साहेब, श्री अमर काळे साहेब आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर प्रकाश टाकत, त्यांच्या कार्याचे स्मरण केले. समाजात समानता, शिक्षण आणि प्रगतीचा संदेश देत त्यांच्या विचारांचे अनुकरण करण्याचे आवाहन प्रमुख पाहुणे यांनी केले

कार्यक्रमाचे वातावरण अत्यंत प्रेरणादायी व उत्साहपूर्ण होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संस्थेचे सचिव श्री प्रभु जाधवर यांनी केले यांनी केले तर आभार प्रदर्शन धुमाळ साहेब यांनी केले

## हक्कासाठी एल्गार मुस्लिम आरक्षण मोर्चात उसळणार जनसागर !
## मुस्लिम आरक्षण मोर्चात लाखोच्या संख्येने उपस्थित राहावे ह्व अरबाज पठाण

मानूर / शाहेबाज पठाण ह्व

मुस्लिम समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिक हक्कांसाठी सकल मुस्लिम आरक्षण कृती समितीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या एल्गार मोर्चाला अभूतपूर्व प्रतिसाद मिळत असून, जिल्हाभरातून मोठ्या प्रमाणात जनसागर उसळणार असल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे. राज्य शासनाने रह केलेल्या ५ टक्के मुस्लिम आरक्षणाच्या निषेधार्थ हा मोर्चा येत्या १७ एप्रिल रोजी बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकणार आहे.

या मोर्चात जिल्ह्यातील विविध तालुक्यांतून हजारी नव्हे तर लाखो समाजबांधव सहभागी होणार असल्याचे आयोजकांनी सांगितले आहे. विशेषत तरुणाई, विद्यार्थी आणि जेष्ठ नागरिक यांचा उत्स्फूर्त सहभाग लक्षवेधी ठरणार आहे. मोर्चात सहभागी होणार आंदोलनकर्ते हातात फलक, बनर घेत शांतपने आपल्या हक्कासाठी आवाज उठवणार आहेत.आरक्षण आमचा हक्क आहे. शिक्षण आणि नोकरीत समान संधी द्या, अन्याय सहन करणार नाही .अशा आशयाच्या फलकांनी राज्य शासनाचे लक्ष वेधले जाणार आहेत.सकल मुस्लिम आरक्षण कृती समितीचे प्रमुख मानूर गावचे भुमीपुत्र अरबाज पठाण यांनी सांगितले आहे. मुस्लिम समाजाला शिक्षण आणि नोकरीच्या क्षेत्रात मागे टाकले जात आहे.

असुन आरक्षण रद्द केल्याने समाजाच्या प्रगतीवर गंभीर परिणाम झाला आहे. त्यामुळे हा मोर्चा केवळ आंदोलन नसून आपल्या हक्कासाठीचा निर्मायक लढा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, मोर्चाच्या पार्श्वभूमीवर प्रशासनही सतर्क झाले असून, कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी विशेष बंदोबस्त ठेवण्याची तयारी सुरू आहे. मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या गर्दीच्या पार्श्वभूमीवर वाहतूक व्यवस्थेतही बदल करण्यात येण्याची शक्यता आहे. समाजातील विविध संघटना, राजकीय पक्ष आणि सामाजिक कार्यकत्यांनी वा मोर्चाला पाठिंबा दर्शविला असून, एकजूट आणि संघटित शक्तीच हक्क मिळवून देऊ शकते असा विश्वास व्यक्त केला जात आहे. एकूणच, १७ एप्रिल रोजी होणारा हा एल्गार मोर्चा मुस्लिम समाजाच्या हक्कासाठीची मोठी ताकद दाखवणारा ठरणार असून, राज्य शासनाचे लक्ष वेधून घेगारा ऐतिहासिक क्षण ठरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे..

चौकट

अरबाज पठाण यांच्या हाकेने सकल मुस्लिम मावळे एकवटणार

मुस्लिम समाजासाठी रद्द करण्यात आलेल्या ५ टक्के आरक्षणाच्या पुनर्स्थापनेसाठी १७ एप्रिल रोजी बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर काढण्यात येणाऱ्या एल्गार मोर्चासाठी समाजात मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे.

या मोर्चात जिल्हाभरातून मोठ्या संख्येने समाजबांधव सहभागी होणार असल्याचे दिसून येत आहे. या पार्श्वभूमीवर अरबाज पठाण यांनी दिलेल्या हाकेने सकल मुस्लिम समाज मोठ्या




संख्येने एकत्र येणार असल्याची चर्चा सुरू आहे. हा मोर्चा केवळ आंदोलन नसुन आपल्या हक्कासाठीचा एल्गार आहे. समाजातील प्रत्येक घटकांनी एकजुटीने यात सहभागी व्हावे, असे आवाहन अरबाज पठाण यांनी केले आहे..

# तळणीत भीमगर्जना! सम्राट अशोक, महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची संयुक्त जयंती उत्साहात साजरी

## भव्य मिरवणुकीने वेधले लक्ष; विद्युत रोषणाईतील रथ, डीजेच्या तालावर तरुणाई-महिलांचा जल्लोष; त्रिशरण पंचशीलने समारोप

तळणी प्रतिनिधी:- मंठा तालुक्यातील तळणी येथे चक्रवर्ती सम्राट अशोक, महात्मा ज्योतिराव फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त १४ एप्रिल रोजी अभूतपूर्व उत्साहात भव्य मिरवणूक काढण्यात आली. सार्वजनिक जयंती महोत्सव समितीच्या वतीने आयोजित या सोहळ्यामुळे संपूर्ण गाव भीममय झाले होते. 'जय भीम'सह महापुरुषांच्या जयघोषांनी अवघा परिसर दणाणून गेला होता.

**भव्य रथांनी वेधले नागरिकांचे लक्ष**

या जयंती सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे तिन्ही महामानवांच्या विविध रूपांतील भव्य प्रतिमा जिवंत घोड्यांच्या आकर्षक रथावर विराजमान करण्यात आल्या होत्या. विद्युत रोषणाईने सजवलेल्या रथांमुळे मिरवणूक मार्ग प्रकाशमय झाला




होता. सायंकाळी पाच वाजता वसंत नगर येथून मिरवणुकीला प्रारंभ होताच जणू जनसागरच रस्त्यावर उतरल्याचे चित्र पाहायला मिळाले.

**निळे फेटे, भीमगीते आणि महिलांचा उत्स्फूर्त सहभाग**

मिरवणुकीत सहभागी नागरिकांनी पांढरे शुभ्र वस्त्र आणि डोक्यावर निळे फेटे परिधान करून एकात्मतेचा संदेश दिला. डी.जे. साउंड सिस्टीमवर भीमगीतांच्या सुरावटी घुमत असताना तरुणाईने उत्साहाने ठेका धरला. विशेष म्हणजे यावर्षी महिलांचा सहभाग लक्षणीय ठरला. अनेक महिलांनी डॉ. बाबासाहेबांच्या जीवनकार्यावर आधारित गीतांवर नृत्य करत जल्लोष व्यक्त केला. महिला-पुरुष, युवक-युवती, अबालवृद्ध यांचा उत्साह ओसंडून वाहत होता.

**सामाजिक सलोख्याचे दर्शन**

मिरवणुकीत सर्व धर्मीय बांधवांनी स्वयंस्फूर्तीने सहभाग घेत सामाजिक ऐक्य व बंधुत्वाचा संदेश दिला. वसंत नगर येथून सुरू झालेली मिरवणूक बसस्थानक चौक, महाराणा प्रताप चौक, माळी गल्ली, मुस्लिम गल्ली व वडार गल्ली या प्रमुख मार्गावरून मार्गक्रमण करत तब्बल पाच तासांनी नालंदा बौद्ध विहार येथे दाखल झाली.

**पिण्याच्या पाण्याची व्यवस्था**

उन्हाची तीव्रता लक्षात घेऊन समितीच्या वतीने पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. तसेच गणेशराव कापकर यांनीही आपल्या घरासमोर नागरिकांसाठी थंड पाण्याची सोय करून सामाजिक बांधिलकी जपली.

**त्रिशरण पंचशीलने सांगता**

नालंदा बौद्ध विहार येथे उपस्थितांनी सामूहिक त्रिशरण व पंचशील ग्रहण करून मिरवणुकीचा समारोप केला. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिस प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवला होता. संपूर्ण कार्यक्रम शिस्तबद्ध व शांततेच्या वातावरणात पार पडल्याने सार्वजनिक जयंती महोत्सव समितीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

**तळणी परिसरातही जल्लोष**

तळणीसह कोकरंबा, शिरपूर, वडगाव सरहद, देवठाणा उस्वद, वाघाळा, दहिफळ खंदारे, दहा, खोरवाड आदी गावांमध्येही भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती मोठ्या जल्लोषात साजरी करण्यात आली. सामाजिक समता, बंधुता आणि शिक्षणाचा संदेश देणाऱ्या या जयंती उत्सवामुळे परिसरात प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले.



# संभाजी ब्रिगेड जाफराबाद तालुका पदाधिकारी निवड जाहीर

जाफराबाद /प्रतिनिधी :-

संभाजी ब्रिगेडच्या जाफराबाद तालुक्यातील पदाधिकाऱ्यांची निवड जाहीर करण्यात आली असून, तालुका अध्यक्षपदी विशाल पाटील वाकडे, उपाध्यक्षपदी प्रदीप पाटील म्हस्के तर सचिवपदी सुरेश दुनगहू यांची निवड करण्यात आली आहे. या निवडीबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना अधिकृत नियुक्तीपत्र जिल्हाध्यक्ष कैलास खांडेभराड व जिल्हा सचिव दत्तात्रय कपाळे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. संभाजी ब्रिगेडच्या वैचारिक चळवळीत सातत्याने श्रम, वेळ, बुद्धी व कौशल्य यांचे योगदान दिल्याची दखल घेऊन ही नियुक्ती करण्यात आल्याचे नियुक्तीपत्रात नमूद करण्यात आले आहे.

संघटनेच्या कार्याला अधिक गती देत समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी प्रयत्न करावेत, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

यावेळी जाफराबाद येथील संभाजी ब्रिगेड कार्यालयात महत्त्वाची बैठक पार पडली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी राज्याचे कोशाध्यक्ष संतोष गाजरे होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून विभागीय उपाध्यक्ष विजय वाढेकर उपस्थित होते. तसेच जालना जिल्हाध्यक्ष कैलास खांडेभराड, जिल्हा कार्याध्यक्ष योगेश पवार, जिल्हा सचिव दत्तात्रय कपाळे, जिल्हा उपाध्यक्ष संदीप पंडीत, मराठा सेवा संघाचे तालुकाध्यक्ष सुनील लोखंडे, सचिव प्रा. विनोद शेळके, ज्ञानेश्वर पाबळे, प्रभू गाढे, भरत मोरे आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

# निर्भय महाराष्ट्र पार्टीच्या आष्टी शहराध्यक्षपदी गणेश रोकडे यांची निवड

आष्टी - (प्रतिनिधी) निर्भय महाराष्ट्र पार्टीच्या आष्टी शहराध्यक्षपदी गणेश दिलीप रोकडे यांची निवड करण्यात आली आहे. पक्षाचे राज्य संघटक बालाजी आबदार यांनी औपचारिक नियुक्तीपत्र देऊन या निर्णयाची घोषणा केली. रोकडे यांच्या निवडीमुळे आष्टी शहरातील पक्ष संघटना अधिक सशक्त होण्यास मदत मिळणार असून, सामाजिक आणि राजकीय प्रश्नांवर प्रभावीपणे काम करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे. पक्ष विस्तार, जनसंपर्क वाढविणे जेणेकरून कार्यकर्त्यांमध्ये उत्साह निर्माण करण्यात ते सक्रिय भूमिका निभावतील, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.



नियुक्तीपत्रात पक्षाच्या नियमानुसार या पदाचे नूतनीकरण दर १०० दिवसांनी करणे बंधनकारक असल्याचे स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे. गणेश रोकडे यांच्या निवडीबद्दल आष्टी शहरातून अभिनंदन आणि शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# आईच्या स्मृतीतून साकारला आदर्श उपक्रम : ५० हजारांचे शैक्षणिक साहित्य विद्यार्थ्यांना भेट

आष्टी - (राजेंद्र लाड) डोईठाण येथील कै. आश्राबाई सारंगधर खाडे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ एक स्तुत्य व प्रेरणादायी उपक्रम राबविण्यात आला. जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, डोईठाण (ता. आष्टी, जि. बीड) येथील सर्व ८० विद्यार्थ्यांना सुमारे ५० हजार रुपये किमतीचे शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद झळकला असून संपूर्ण गावात या कार्याचे कौतुक होत आहे.

कै. आश्राबाई सारंगधर खाडे यांचे दि. ३ एप्रिल रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनानंतर कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असला तरी त्यांच्या स्मृतींना साजेशा पद्धतीने समाजोपयोगी कार्य करण्याचा निर्णय कुटुंबीयांनी घेतला. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत त्यांनी पारंपरिक पद्धतीऐवजी रक्षा विसर्जन नदीपात्रात न करता शेतामध्ये खड्डा खोदून विधिवत पार पाडले, हा देखील एक अनुकरणीय उपक्रम ठरला.

कै. आश्राबाई यांच्या स्मरणार्थ



शाळेतील विद्यार्थ्यांना स्कूल बॅग, रजिस्टर, पेन, पाणी बॉटल, टिफीन बॉक्स, कंपास साहित्य, फोल्डर आदी शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. शिक्षणासाठी आवश्यक असणाऱ्या वस्तूंचे वाटप झाल्याने विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला. हा उपक्रम डॉ. सोमीनाथ सारंगधर खाडे, श्री. रेवणनाथ सारंगधर खाडे आणि श्रीमती सविता रावसाहेब गर्जे यांनी आईच्या स्मृतीप्रित्यर्थ राबविला. आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो या निःस्वार्थ भावनेतून त्यांनी हा उपक्रम साकारला असून त्यांच्या या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

कै. आश्राबाई खाडे व कै. सारंगधर खाडे यांनी आयुष्यभर अध्यात्म, परोपकार आणि सामाजिक कार्याची कास धरली होती. त्याच संस्कारांचा वारसा त्यांच्या पुढील पिढीने जोपासत समाजहिताचे कार्य पुढे चालविले आहे. डॉ. सोमीनाथ खाडे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठात संचालक म्हणून कार्यरत असून, श्री. रेवणनाथ खाडे हे डोईठाण व परिसरात सामाजिक कार्यात सक्रिय भूमिका बजावत आहेत. या कार्यक्रमास गावचे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व सदस्य, शाळेचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षक, ग्रामस्थ तसेच मोठ्या संख्येने तरुण वर्ग उपस्थित होता. या उपक्रमामुळे गावात सकारात्मक संदेश पोहोचला असून, दुःखाच्या प्रसंगातही समाजासाठी काहीतरी करण्याची प्रेरणा देणारा हा पथदर्शी उपक्रम ठरला आहे.



# जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कानडीमाळी शाळेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

केज/प्रतिनिधी

दि.१४ एप्रिल रोजी जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कानडी माळी या ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक श्री.गिरी सर,उपाध्यक्ष शाळेच्या आदर्श शिक्षिका श्रीमती दुबाले मॅडम या होत्या. तसेच कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्रीमती जाधव मॅडम,चाटे मॅडम, देशमुख मॅडम,थाटकर मॅडम,शेलार मॅडम व घाडगे मॅडम यांनी प्रयत्न केले.जयंतीनिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार विद्यार्थ्यां मध्ये रुजावे यासाठी भाषण स्पर्धा घेण्यात आली.इयत्ता पाचवीच्या मुलांनी बाल सभेचे आयोजन केले होते. तसेच सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या गीतावर मुलांनी ठेका धरला.श्रीमती चाटे मॅडम व गिरी सर यांनी विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले.अशा प्रकारे अतिशय उत्साही वातावरणात जयंती साजरी करण्यात आली.

# भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त कौशल्य विकास विभागाकडून निबंध स्पर्धेचे आयोजन

## विजेत्यांना पारितोषिक तसेच सहभाग घेणाऱ्या स्पर्धकांना मिळणार प्रशस्तीपत्र

**अंबाजोगाई (प्रतिनिधी)**

**भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्राचे सन्माननीय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या मार्गदर्शनानूसार कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या वतीने राज्यभरात निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांमध्ये विचारप्रवर्तक लेखनाची आवड निर्माण करणे तसेच भारतरत्न डॉ.आंबेडकर यांच्या विचारांचा प्रसार करणे हा या उपक्रमाचा उद्देश असल्याचे ना.मंगलप्रभातजी लोढा (मंत्री, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता, महाराष्ट्र राज्य.) यांनी सांगितले.**

भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वातंत्र्य, समता, बंधुता या तत्वांसाठी आपले आयुष्य समर्पित करून समाजाला दिशा देण्याचे कार्य केले आहे. त्यांचे कार्य केवळ एका निबंधात मांडणे शक्य नाही. गट १ - आयटीआय / डिप्लोमा प्रशिक्षणार्थी व उत्तीर्ण विद्यार्थी, बायफोकल व एमसीव्हीसी अभ्यासक्रमाचे विद्यार्थी तसेच गट २ - पुरूष / महीला खुला यांच्यासाठी राज्यस्तरीय निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. स्पर्धा आयोजनाचा विधायक उद्देश असा की, डॉ.आंबेडकर यांनी महिलांविषयी केलेले कार्य महिला साक्षमीकरणात त्यांनी दिलेले योगदान (उदाहरणार्थ - मतदानाचा हक्क, वारसा हक्क, प्रसूती रजेचा हक्क.) या विषयावर ही निबंध स्पर्धा होणार आहे.

स्पर्धेचे स्वरूप : या स्पर्धेत पहिल्या गटात शासकीय आयटीआय, खाजगी आयटीआय, तसेच आयटीआय उत्तीर्ण झालेले विद्यार्थी यात सहभागी होऊ शकतात. तर विषयासाठी विद्यार्थ्यांना ५००ते ८०० शब्दांची मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. दुसरा खुला गट असून यात राज्यातील सर्व महिला आणि पुरूष सहभागी होऊ शकतात या गटाला ८०० ते १२०० शब्दांची मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. दोन्ही गटाला निबंध केवळ मराठी भाषेत सादर करावा लागणार आहे. स्पर्धेचा कालावधी १४ एप्रिल ते २० एप्रिल २०२६ हा निश्चित करण्यात आला आहे. स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणारे स्पर्धक (९१५२२३०१९३) या मोबाईल क्रमांकाशी संपर्क करू शकतात. त्याचबरोबर या स्पर्धेच्या नोंदणीसाठी क्यू आर कोड ही देण्यात आला आहे. नोंदणी केल्यावर स्पर्धकांना त्याची पोच ही मिळणार आहे. या स्पर्धेद्वारे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव, संविधानिक मूल्ये आणि नेतृत्वगुण विकसित करण्यावर भर दिला जात आहे. तसेच उत्कृष्ट निबंधांना रोख रक्कम स्वरूपात पारितोषिके देऊन विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी स्मृतिचिन्ह व प्रशस्तीपत्र ही दिले जाणार असल्याची माहिती कौशल्य विकास अधिकाऱ्यांनी दिली आहे.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर साहित्य अकॅडमीचा राज्यस्तरीय प्रथम पुरस्कार उपप्राचार्य प्रा.गौतम गायकवाड यांच्या ग्रंथास जाहीर

आंबेडकरी चळवळीचा सेनानी दादासाहेब गायकवाड या ग्रंथाची निवड

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

येथील प्रवर्तनवादी चळवळीतील आघाडीचे लेखक उपप्राचार्य प्रा.गौतम गायकवाड यांच्या आंबेडकरी चळवळीचा सेनानी दादासाहेब गायकवाड या ग्रंथास सन-२०२५ साठी दिला जाणारा डॉ.बाबासाहेब आंबेडकर साहित्य अकॅडमीचा राज्यस्तरीय प्रथम पुरस्कार जाहीर झाला आहे. या बाबतचे पत्र त्यांना नुकतेच प्राप्त झाले आहे. त्यांच्या या उल्लेखनिय यशाबद्दल उपप्राचार्य प्रा.गायकवाड यांचे सर्वस्तरांतून अभिनंदन होत आहे.

यापूर्वी याच संस्थेचा व्हि.जे.आरक या ग्रंथास राज्यस्तरीय तृतीय, प्रज्ञासुर्याचे सुर्यपुत्र या ग्रंथास राज्यस्तरीय प्रथम, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि आंबेडकरी साहित्य (आकलन आणि अवलोकन) या ग्रंथास सन-२०२२ साठी दिला जाणारा राज्यस्तरीय डॉ.बाबासाहेब आंबेडकर साहित्य अकॅडमी द्वितीय आणि गतवर्षी त्यांना बुध्द प्रबुद्ध विचारांच्या पाऊलखुणा या ग्रंथास सन-२०२४ साठी दिला जाणारा डॉ.बाबासाहेब आंबेडकर साहित्य अकॅडमीचा राज्यस्तरीय तृतीय पुरस्कार मिळाला आहे. या उपरोक्त संस्थेचा हा सलग पाचवा पुरस्कार उपप्राचार्य प्रा.गौतम गायकवाड यांना मिळाला आहे. ही विशेष उल्लेखनीय बाब आहे.

उपप्राचार्य प्रा.गायकवाड हे आंबेडकरी चळवळीतील आघाडीचे लेखक, कवी आणि विचारवंत आहेत. त्यांच्या समग्र व उल्लेखनिय कारकिर्दीची दखल घेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर साहित्य अकॅडमी, लातूर यांच्या वतीने प्रा.गायकवाड यांनी लिहिलेल्या आंबेडकरी चळवळीचा सेनानी दादासाहेब गायकवाड या ग्रंथास सन-२०२५ साठी दिला जाणारा डॉ.बाबासाहेब आंबेडकर साहित्य अकॅडमीचा राज्यस्तरीय प्रथम पुरस्कार जाहीर झाला आहे. या बाबत अकॅडमीचे सचिव प्रकाश घादगिने यांनी नुकतेच रविवार, दिनांक १२ एप्रिल २०२६ रोजी कळविले आहे. त्यानुसार या पुरस्काराचे वितरण याच महिन्यात रविवार, दि.२८ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी ५ या वेळेत डॉ.भालचंद्र ब्लड बँक, बस स्टँड मागे, लातूर येथे आयोजित डॉ.बाबासाहेब आंबेडकर साहित्य अकादमीचे दुसरे साहित्य संमेलनात मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे. प्रा.गौतम गायकवाड यांना यापुर्वीही डॉ.जगजीवनराम लेखक पुरस्कार (नेपाळ), प्रेरणा समीक्षा पुरस्कार (पुणे), समाजभुषण पुरस्कार (सोलापूर), उत्कृष्ट लेखक पुरस्कार (लातूर) आणि व्ही.जे.आरक या ग्रंथास राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झाले आहेत. उपप्राचार्य प्रा.गायकवाड यांचे २८ हून अधिक पुस्तके, असंख्य विशेषांकांचे संपादन, विपुल वैचारिक लेखन, विविध वृत्तपत्र आणि नियतकालिकांतून प्रासंगिक लेखन, दहा पेक्षा अधिक ग्रंथांचे संपादन, त्यांनी केले आहे. या सोबतच सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि धार्मिक कार्यात त्यांचा सक्रीय सहभाग राहिला आहे. अनेक चर्चासत्रात सहभाग घेत विविध नियतकालिकांतून त्यांचे ३१५ हून अधिक लेख प्रकाशित झाले आहेत. नवोदित साहित्यिक, कवी यांना प्रोत्साहन देण्याचे तसेच त्यांच्या ग्रंथ प्रकाशनासाठी प्रसंगी सर्वोतोपरी भरीव सहकार्य करण्याचे कार्य देखिल प्रा.गायकवाड यांनी वेळोवेळी केले आहे. व्ही.जे.आरक सेवाभावी संस्था आणि परिवर्तन साहित्य मंडळाचे ते अध्यक्ष ही आहेत. तसेच परिवर्तन संशोधन मासिकाचे कार्यकारी संपादक आहेत. परिवर्तन साहित्य संमेलनाच्या आयोजनात त्यांचा पुढाकार आहे. विविध विषयांशी संबंधीत ग्रंथ, काव्य संग्रह, प्रवर्तनवादी चळवळीला बळ देणाऱ्या ग्रंथाचे लेखक म्हणून ही ते ओळखले जातात. त्यांच्या काही ग्रंथसंपदा प्रकाशनाच्या वाटेवर आहेत. उपप्राचार्य प्रा.गौतम केरबा गायकवाड हे सध्या अंबाजोगाईतील खोलेश्वर महाविद्यालयाचे उपप्राचार्य आणि मराठी भाषा विभागात प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. मागील ३४ वर्षांपासून ते अध्यापनाचे कार्य करीत आहेत. त्यांनी नाटक, कथा, कविता, प्रासंगिक, संशोधन, संपादन आदी विपुल ग्रंथ व साहित्य संपदा निर्मिली आहे. गतवर्षी त्यांना बुध्द प्रबुद्ध विचारांच्या पाऊलखुणा या ग्रंथास सन-२०२५ साठी दिला जाणारा डॉ.बाबासाहेब आंबेडकर साहित्य अकॅडमीचा राज्यस्तरीय तृतीय पुरस्कार मिळाला आहे. तर यावर्षी त्यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर साहित्य अकॅडमी, लातूर यांच्या वतीने त्यांनी लिहिलेल्या आंबेडकरी चळवळीचा सेनानी दादासाहेब गायकवाड या ग्रंथास सन-२०२५ साठीचा राज्यस्तरीय प्रथम पुरस्कार जाहीर झाला आहे. त्याबद्दल उपप्राचार्य प्रा.गौतम गायकवाड यांचे सामाजाच्या सर्वस्तरांतून अभिनंदन होत आहे.



# श्री स्वामी समर्थ महाराज यांची पुण्यतिथी वडवणी केंद्रात साजरी



वडवणी /प्रतिनिधी

श्री स्वामी समर्थ महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त अखंड नाम जप यज्ञ , गुरुचरित्र पारायण सोहळा ची सांगता दिनांक १५/०४/२०२६ बुधवार रोजी श्री स्वामी समर्थ केंद्र दिंडोरी प्रणित चिंचवण रोड वडवणी येथे उत्साहात साजरी करण्यात आली.

भगवान श्री दत्तात्रेय यांचे तिसरे पूर्णावतार म्हणून अक्कलकोटच्या श्री स्वामी समर्थांची ओळख आहे. सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट येथे स्वामींच्या मठामध्ये दर्शनाला नियमित मोठी गर्दी असते. यासोबतच महाराष्ट्रभरातील स्वामी भक्त स्थानिक श्री स्वामी समर्थ केंद्र दिंडोरी प्रणित केंद्रात जाऊन स्वामींची आराधना करतात. पौराणिक आधारानुसार, स्वामींनी चैत्र वद्य त्रयोदशीच्या दिवशी अक्कलकोट येथील 'वटवृक्ष समाधी मठ स्थानी' माध्याह्न समयी आपल्या अवतारकार्याची समाप्ती केली. हा दिवस स्वामींची पुण्यतिथी म्हणून आयोजिला जातो, दिनांक गुरुवार ०९ एप्रिल २०२६ रोजी पासून श्री स्वामी समर्थांच्या सेवेत सेवेकरी अखंड नाम जप यज्ञ गुरुचरित्र पारायण सप्ताह सुरू करण्यात आला होता.वडवणी

शहरातील दिंडोरी प्रणित श्री स्वामी समर्थ केंद्रामध्ये श्री स्वामी समर्थ महाराज पुण्यतिथी निमित्त गुरुमाऊली आण्णासाहेब मोरे व चंद्रकांत दादा मोरे यांच्या आदेशाने अखंड स्वामीनाम जप यज्ञ सप्ताह व सामूहिक गुरुचरित्र पारायण सोहळा आयोजित करण्यात आला होता.. या सप्ताह काळात नवनाथ पारायण, अखंड स्वामीनाम जप, अखंड दोन विना वादन, अखंड दोन स्वामी चरित्र पठणासह गणेश याग, मनोबोध याग, गीताई याग, चंडी याग, स्वामी याग, रुद्र याग, मल्हारी याग, तसेच रोज नित्यस्वहाकार व त्रिकाल आरतीसह सायंकाळी टाळमृदंगाच्या गजरात औदुंबर प्रदक्षिणा व विष्णुसहस्त्रनाम, गिताई, मनाचे श्लोक, पसायदान, तुकाराम अभंग आदी धार्मिक कार्यक्रम घेण्यात आले.

# तरुणांनी राजकारणात उतरून सामाजिक-आर्थिक लोकशाही घडवावी प्रा.राजेंद्र भोसले

## अंकुशराव टोपे महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी



जालना /प्रतिनिधी :- आजच्या तरुण पिढीला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची नितांत गरज आहे.हे विचार केवळ पुस्तकांत न राहता घराघरात पोहोचले पाहिजेत. शिक्षणासोबतच देशाच्या जडणघडणीसाठी आणि सामाजिक-आर्थिक लोकशाहीच्या स्थापनेसाठी तरुणांनी राजकारणात सक्रिय सहभाग घ्यावा असे प्रभावी आवाहन प्रा.राजेंद्र भोसले यांनी केले.मत्स्योदरी शिक्षण संस्था संचलित अंकुशराव टोपे महाविद्यालय जालना येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. दादासाहेब गजहंस होते.कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने झाली.यावेळी उपप्राचार्य डॉ.संजय पाटील, पर्यवेक्षक प्रा.रामप्रसाद भालेकर,डॉ.संतोष करवंदे, कार्यालय अधीक्षक सुरेश ठेंग यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रा.भोसले यांनी आपल्या भाषणात छत्रपती शिवाजी महाराज ते डॉ.आंबेडकर यांच्या गुरु-शिष्य परंपरेचा संदर्भ देत सामाजिक परिवर्तनाची परंपरा अधोरेखित केली. त्यांनी स्त्री-पुरुष समानता महिलांचे शिक्षण, विधवा पुनर्विवाह आणि कामगारांसाठी समान काम समान वेतन या बाबासाहेबांनी मांडलेल्या क्रांतिकारी संकल्पनांचा उल्लेख केला.

वैज्ञानिक दृष्टिकोन आणि वाचन संस्कृतीचा आग्रह

तरुणांनी अंधश्रद्धेला बळी न पडता वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारावा आणि वाचन संस्कृती जोपासावी असे सांगत त्यांनी विवेकशील समाजनिर्मितीचे महत्त्व अधोरेखित केले.

शिका संघटित व्हा आणि संघर्ष करा यशाचा मंत्र

अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ.दादासाहेब गजहंस यांनी बाबासाहेबांच्या मानवतावादी विचारसरणीवर प्रकाश टाकत शिका संघटित व्हा आणि संघर्ष करा या मूलमंत्राचे पालन करून तरुणांनी आपले भविष्य घडवावे असे आवाहन केले.

यावेळी महाविद्यालयाचे कर्मचारी ज्ञानेश्वर पवार यांनी महाविद्यालयास भारतीय संविधानाच्या उद्देशिकेची प्रत भेट दिली.

कार्यक्रमास डॉ.कार्तिक गावंडे, डॉ. पंडित रानमाळ, डॉ. रामदास वैद्य, प्रा. अविनाश भालेराव, डॉ. तुकाराम गजर, डॉ. सुजाता देवरे, डॉ. सीमा निकाळजे, प्रा. महादेव माने यांच्यासह प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. बद्रीनाथ शिंदे यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. शंकर तिकांडे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रा.से.यो. विभागाचे डॉ. मसुद अन्सारी, डॉ. मनोरमा पात्रे, रघुनाथ शिंदे व असेफ शेख यांनी विशेष परिश्रम घेतले.



# केज पोलिसांची मोठी कारवाई ; हॉटेल न्यू शिवनेरी परिसरात अवैध दारू साठ्यावर छापा

केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील मसाजोग परिसरात अवैध दारू विक्री करणाऱ्यांविरुद्ध उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयाने मोठी कारवाई केली आहे.या छाप्यात हजारो रुपयांचा देशी-विदेशी दारूचा साठा जप्त करण्यात आला असून एका आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नेमकी घटना काय?

मिळालेल्या माहिती नुसार,१४ एप्रिल २०२६ रोजी सहाय्यक पोलीस अधीक्षक श्री.वेंकटराम यांना मसाजोग येथील हॉटेल न्यू शिवनेरीच्या बाजूला असलेल्या पत्रा शेडमध्ये बेकायदेशीर दारू साठा असल्याची गुप्त माहिती मिळाली होती.या माहितीच्या आधारे त्यांनी तात्काळ पथकाला कारवाईचे आदेश दिले.

पोलिसांची कारवाई आणि जप्त मुद्देमाल

उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयातील कर्मचारी पोह / ९९६ बाळासाहेब,पोह/१३८४ विकास आणि पोना/१०३५ अनिल यांनी दोन पंचासमक्ष सदर ठिकाणी छापा टाकला. यावेळी तेथे विक्रीसाठी साठवून ठेवलेला देशी,विदेशी दारू आणि बिअरचा साठा आढळून आला. पोलिसांनी या कारवाईत एकूण १९,८६५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

आरोपीवर गुन्हा दाखल

या प्रकरणी राजेंद्र श्रीमंत पोपळे (रा.मसाजोग,ता. केज) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलीस हवालदार विकास (बं.नं. १३८४) यांनी दिलेल्या तक्रारी वरून ही कायदेशीर प्रक्रिया पार पडली.

वरिष्ठांच्या मार्गदर्शना खाली सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत,अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सहाय्यक पोलीस अधीक्षक श्री.वेंकटराम यांच्या नेतृत्वात पार पडली.या कारवाईमुळे तालुक्यातील अवैध धंदे करणाऱ्यांचे धाबे दणाणले असून,अशा कारवाया पुढेही सुरू राहतील असा इशारा प्रशासनाकडून देण्यात आला आहे.



आष्टी - कडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये विश्वरत्न, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली.

# विठ्ठलगडावर भक्तीचा महासागर,वैराग्यमूर्ती रंधवे बापूंच्या नेतृत्वाखाली अखंड हरिनाम सप्ताहाचे भव्य आयोजन

## निस्वार्थ कीर्तन सेवेची वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये नोंद; तिसऱ्या वर्षीही रंगणार नामस्मरणाचा जागर

आष्टी - (राजेंद्र लाड) पाटोदा शहराचे वैभव असलेल्या श्री क्षेत्र विठ्ठलगड येथे प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही सलग तिसऱ्या वर्षी अखंड हरिनाम सप्ताहाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. पाटोदा शहरातील विठ्ठलगडाचे महंत, वैराग्यमूर्ती ह.भ.प. श्री रामकृष्ण महाराज रंधवेबापू यांच्या मार्गदर्शनाखाली दि. १९ ते २६ एप्रिल २०२६ या कालावधीत हा अध्यात्मिक सोहळा पार पडणार आहे. या सप्ताहाच्या निमित्ताने संपूर्ण परिसर भक्तीमय वातावरणाने उजळून निघणार आहे.

दिग्गज कीर्तनकारांची अध्यात्मिक पर्वणी - सप्ताहादरम्यान दररोज पहाटे काकडा आरती, त्यानंतर हरिपाठ, श्री ज्ञानेश्वरी पारायण, सुमधुर भजन आणि नामवंतांची कीर्तने असा भरगच्च धार्मिक कार्यक्रम पार पडणार आहे. यंदाच्या सप्ताहात राज्याच्या कानाकोपऱ्यातून



दिग्गज कीर्तनकार उपस्थित राहणार आहेत. यामध्ये खालील मान्यवरांची अमृतवाणी भाविकांना ऐकायला मिळणार आहे. ह.भ.प.श्री नवनाथ महाराज फुटाणे, ह.भ.प. श्री समाधान महाराज शर्मा, ह.भ.प.श्री प्रकाश महाराज साठे, ह.भ.प.श्री अक्रूर महाराज साखरे, ह.भ.प.श्री अर्जुन महाराज लाड, गुरुवर्य ह.भ.प.श्री प्रकाश महाराज बोधले महामंडलेश्वर, ह.भ.प.श्री अमृतश्रम स्वामी तसेच, सप्ताहाच्या सांगतेचे म्हणजेच काल्याचे कीर्तन स्वतः वैराग्यमूर्ती रामकृष्ण महाराज रंधवेबापू यांचे होणार आहे.

निस्वार्थ सेवेला जागतिक सन्मान (वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड) - या सप्ताहाचे मुख्य आयोजक रंधवे बापू यांचे कार्य खऱ्या अर्थाने वंदनीय आहे. आजच्या काळात त्यांनी आपल्या कीर्तन सेवेसाठी आजतागायत एक रुपयाही मानधन न घेता समाजाला अखंड सेवा दिली आहे. त्यांच्या या अद्वितीय आणि निस्वार्थ सेवेची दखल थेट वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड ने घेतली असून, तिथे त्यांच्या नावाची नोंद झाली आहे. ही बाब केवळ आष्टी, पाटोद्यासाठीच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रासाठी अत्यंत अभिमानाची आहे.

माणसाला सत चित आनंद स्वरूपाचा बोध व्हावा - सप्ताहामागील भूमिका स्पष्ट करताना महाराज सांगतात की, माणसाच्या जीवनात सुख, शांती आणि समाधान नांदावे तसेच त्याला मुक्तीचा मार्ग मिळावा यासाठी समाजजागृती अत्यंत गरजेची आहे. मी सत चित आनंद स्वरूप आहे या मूळ तत्त्वाचा मानवाला बोध व्हावा याच उदात्त हेतूने कथा आणि कीर्तनांचे आयोजन केले जाते. या सप्ताहाच्या माध्यमातून समाजात भक्ती, सद्भावना आणि शांततेचा विचार रुजवण्याचे महान कार्य विठ्ठलगडावरून सुरू आहे. सप्ताहाच्या समारोपाच्या दिवशी दि. २६ एप्रिल रोजी विठ्ठलगडाच्या भक्तगणांतर्फे महाप्रसादाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. या परिसरातील, राज्यभरातील जास्तीत जास्त भाविकांनी या अखंड हरिनाम सप्ताहात सहभागी होऊन अध्यात्मिक सेवेचा आणि महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन मुख्य आयोजक ह.भ.प. वैराग्यमूर्ती रामकृष्ण महाराज रंधवेबापू यांनी केले आहे.

# आष्टी-अहिल्यानगर मार्गावरील कासारी पुलाचे काम पावसाळ्यापूर्वी पूर्ण करा - चेअरमन शांतीलाल भोसले

आष्टी - (प्रतिनिधी) आष्टी ते अहिल्यानगर या अत्यंत वर्दळीच्या मार्गावरील कासारी जवळील पुलाचे काम सध्या अत्यंत कासवगतीने सुरू आहे. पावसाळा तोंडावर आला असून, संबंधित गुत्तेदाराने हे काम ७ जूनपूर्वी तातडीने पूर्ण करावे, अन्यथा या महामार्गावरील वाहतूक पूर्णपणे विस्कळीत होईल, अशी भीती आष्टी तालुका दूध संघाचे चेअरमन शांतीलाल भोसले यांनी व्यक्त केली आहे.

यासंदर्भात त्यांनी आष्टीचे तहसीलदार यांना एक निवेदन दिले असून, पुलाचे काम दर्जेदार आणि जलदगतीने पूर्ण करण्याची मागणी केली आहे. तहसीलदारांना दिलेल्या निवेदनात भोसले यांनी म्हटले आहे की, सध्या आष्टी-अहिल्यानगर या मार्गाचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. साबलखेड ते अहिल्यानगर या टप्प्यातील रस्त्याचे काम संबंधित ठेकेदार वेगाने करत आहे. तसेच कडा ते आष्टी या रस्त्याचेही तब्बल ९० टक्के काम पूर्ण झालेले आहे. मात्र, या सर्व वेगाला कासारी जवळील पुलाच्या अर्धवट कामामुळे खीळ बसली आहे. अलीकडेच कासारी जवळील जुना पूल पाडून त्या ठिकाणी नवीन पुलाचे बांधकाम सुरू करण्यात आले आहे. हा पूल वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आणि मुख्य रहदारीचा आहे. मात्र, नवीन पुलाचे काम अत्यंत संथगतीने सुरू आहे.

अवघ्या दीड-दोन महिन्यांवर पावसाळा येऊन ठेपला आहे. जर हे काम ७ जूनपूर्वी (पावसाळ्यापूर्वी) पूर्ण झाले नाही, तर पावसाळ्यात या मार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनधारकांचा मोठा खोळंबा होऊ शकतो. प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी आणि भविष्यातील धोका लक्षात घेता, महसूल प्रशासन व संबंधित विभागाने ठेकेदाराला त्वरित सूचना द्याव्यात आणि



हे बांधकाम लवकरात लवकर व दर्जेदारपणे पूर्ण करून घ्यावे, अशी आग्रही मागणी चेअरमन शांतीलाल भोसले यांनी निवेदनाद्वारे केली आहे. प्रशासनाने याची दखल न घेतल्यास पावसाळ्यात निर्माण होणाऱ्या वाहतूक कोंडीला सर्वस्वी जबाबदार कोण, असा प्रश्नही या निमित्ताने उपस्थित होत आहे.

# नगरसेवक इजरान भैय्या कुरेशी (एक्का शेठ) यांच्या उपस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी



परतूर /प्रतिनिधी

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त शहरात ठिकठिकाणी उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. प्रभाग क्रमांक १ चे लोकप्रिय नगरसेवक इजरान भैय्या कुरेशी (उर्फ एक्का शेठ) यांनी शहरातील विविध भागात जाऊन महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन केले आणि जयंती साजरी केली.यावेळी आयोजित विविध कार्यक्रमांमध्ये बोलताना इजरान भैय्या कुरेशी यांनी बाबासाहेबांच्या जीवनप्रवासावर प्रकाश टाकला. ते म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जीवन हे केवळ एक संघर्षगाथा नसून, तो प्रत्येक सामान्यासाठी प्रेरणास्त्रोत आहे. अत्यंत कठीण परिस्थितीत, सामाजिक विषमतेचा सामना करत त्यांनी केवळ शिक्षणच पूर्ण केले नाही, तर जगातील सर्वात मोठी राज्यघटना देशाला दिली.एक्का शेठ यांनी प्रभागातील आणि शहरातील विविध मंडळांना भेटी देऊन भीमसैनिकांचा उत्साह वाढवला. केवळ उत्सव न साजरा करता बाबासाहेबांचे विचार आचरणात आणणे काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले बाबासाहेबांनी प्रतिकूल परिस्थितीवर कशी मात केली, याचे उदाहरण देत त्यांनी युवकांना जिद्दीने पुढे जाण्याचे आवाहन केले.

# भरडधान्य खरेदीतील गोंधळानंतर नोंदणी प्रक्रिया रद्द

२० एप्रिलपासून नव्याने सुरुवात

किनवट /प्रतिनिधी

रब्बी हंगामातील भरडधान्य खरेदी प्रक्रियेत निर्माण झालेल्या गोंधळाच्या पार्श्वभूमीवर आदिवासी विकास महामंडळाने महत्त्वाचा निर्णय घेतला असून १३ एप्रिल व त्यापूर्वी झालेली शेतकऱ्यांची नोंदणी प्रक्रिया रद्द करण्यात आली आहे. आता नव्याने २० एप्रिलपासून नोंदणी सुरू करण्यात येणार असल्याची माहिती अधिकृतरित्या देण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्या., नाशिक अंतर्गत उप प्रादेशिक कार्यालय, किनवट यांच्या वतीने तहसीलदार, किनवट यांना पाठवलेल्या पत्रानुसार, आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत रब्बी पणन हंगाम २०२५-२६ मध्ये धान व भरडधान्य (ज्वारी, मका) खरेदीसाठी १३ एप्रिलपासून नोंदणी सुरू करण्यात आली होती. मात्र, काही ठिकाणी ज्या शेतकऱ्यांच्या शेतात प्रत्यक्षात ज्वारी किंवा मका पिकवलेले नाही, अशांनीही नोंदणी केल्याच्या तक्रारी पुढे आल्या.

या संदर्भात शेतकरी शिष्टमंडळाने आमदार भीमराव केराम तसेच उपविभागीय अधिकाऱ्यांकडे निवेदन सादर केले होते. त्यानंतर महसूल विभागामार्फत प्रत्यक्ष शेतावर जाऊन स्थळ तपासणी करूनच तलाठी प्रमाणपत्राच्या आधारे नोंदणी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी तहसीलदारांना तलाठ्यांना तातडीने स्थळ तपासणीचे आदेश देण्याची विनंती करण्यात आली आहे.

दरम्यान, या संपूर्ण प्रकरणाची दखल घेत आदिवासी विकास महामंडळाचे संचालक अशोक भाऊराव मंगाम यांनी किनवट येथील कार्यालयाला भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला. त्यांनी १३ एप्रिल व त्यापूर्वी झालेली सर्व नोंदणी प्रक्रिया रद्द करून २० एप्रिलपासून नव्याने पारदर्शक पद्धतीने नोंदणी सुरू करण्याचा निर्णय जाहीर केला.

नवीन नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रांची यादी देखील जाहीर करण्यात आली असून त्यामध्ये ई-पीक पाहणीसह तलाठी सही व शिक्क्यासह ७/१२ उतारा, तलाठी यांचे स्थळ तपासणी प्रमाणपत्र, आधारकार्ड, बँक पासबुक, केवायसी फॉर्म, तसेच सामाईक क्षेत्र असल्यास संमतीपत्र यांचा समावेश आहे. नोंदणी करताना शेतकरी स्वतः उपस्थित राहणे बंधनकारक करण्यात आले आहे. संचालक अशोक मंगाम हे लवकरच आमदार भीमराव केराम, सहाय्यक जिल्हाधिकारी झेनिथ चंद्र दोनतुला तसेच तहसीलदार डॉ. शारदा चौंडेकर यांची भेट घेऊन या निर्णयाची माहिती देणार असल्याचे सांगण्यात आले. पूर्वीच्या गोंधळामुळे संतप्त झालेल्या शेतकऱ्यांना या निर्णयामुळे काही प्रमाणात दिलासा मिळाला असला तरी नव्याने सुरू होणारी प्रक्रिया पारदर्शक व सुरळीत होईल का, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# प्रभाग क्रमांक ५ मध्ये विविध विकास कामांसाठी नगरसेवक नेम्मानिवार यांचे निवेदन

किनवट प्रतिनिधी : किनवट नगर परिषद अंतर्गत प्रभाग क्रमांक ५ मधील मूलभूत सुविधा व परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी नगरसेवक चंद्रशेखर रंगराव नेम्मानिवार यांनी नगराध्यक्षा सौ. सुजाता येंड्रलवार तसेच मुख्याधिकारी यांना सविस्तर निवेदन सादर केले आहे. या निवेदनात प्रभागातील विविध प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली आहे.

सदर निवेदनात प्रभाग क्रमांक ५ मधील मुख्य व्ही.आय.पी. रोडचे सुशोभिकरण करण्यावर विशेष भर देण्यात आला आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना आधुनिक पथदिवे, दिशादर्शक फलक व सूचना दर्शक बसविण्याची मागणी करण्यात आली असून यामुळे नागरिकांसह बाहेरील नागरिकांना देखील सोयीसुविधा उपलब्ध होणार असल्याचे नमूद करण्यात आले आहे.


तसेच, प्रभागातील विविध ठिकाणी असलेले जुने व निकृष्ट दर्जाचे गतीरोधक अपघातांना कारणीभूत ठरत असल्याने ते तात्काळ काढून टाकून त्यांच्या ठिकाणी नवीन, शास्त्रोक्त पद्धतीने गतीरोधक बसविण्याची मागणी करण्यात आली आहे.

आदर्श नगर परिसरातील नागरिकांना अनेक वर्षांपासून अंतर्गत रस्ते व नाली व्यवस्थेअभावी त्रास सहन करावा लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले असून या भागात पक्के रस्ते व सुसज्ज नाली बांधकाम करण्याची मागणी करण्यात आली आहे.

याशिवाय, संपूर्ण एस.व्ही.एम. परिसरातील ले-आऊटमधील मोकळ्या जागांमध्ये वॉल कंपाऊंड उभारून त्या जागांचे संरक्षण करणे तसेच नागरिकांच्या सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी सभामंडप उभारण्याची मागणीही करण्यात आली आहे.

पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीनेही नगरसेवक नेम्मानिवार यांनी पुढाकार घेत प्रभागातील एस.व्ही.एम. परिसरातील रस्त्यांच्या दोन्ही बाजूंना महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक वनीकरण विभागाच्या समन्वयाने वृक्षारोपण करण्याची मागणी केली आहे. यामुळे परिसर हरित व स्वच्छ राहण्यास मदत होणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

प्रभागातील या सर्व विकास कामांमुळे नागरिकांच्या जीवनमानात सुधारणा होणार असून नगर परिषद प्रशासनाने या मागण्यांकडे गांभीर्याने लक्ष देऊन लवकरात लवकर कार्यवाही करावी, अशी अपेक्षा नगरसेवक चंद्रशेखर नेम्मानिवार यांनी व्यक्त केली आहे.



# घोटी येथे आदिवासी सहकारी संस्थेच्या सभेत यशवंत पाटील कऱ्हाळे यांची बिनविरोध निवड

किनवट प्रतिनिधी दि.१५ : आदिवासी विविध कार्यकारी सहकारी सोसायटी मर्यादित, घोटी यांची मासिक सभा ग्रामपंचायत घोटी येथे संस्थेचे चेअरमन श्यामराव आत्राम यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. सभेला एकूण ११ संचालकांपैकी ९ संचालक उपस्थित होते, तर अनिल कऱ्हाळे पाटील व रामा सिंदमवाड हे अनुपस्थित होते. आवश्यक कोरम पूर्ण झाल्यानंतर सभेच्या कामकाजास सुरुवात करण्यात आली.

यावेळी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., नांदेड यांच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी संस्थेचा प्रतिनिधी निवडण्याबाबतचा विषय चर्चेसाठी मांडण्यात आला. या विषयावर यशवंत पाटील कऱ्हाळे यांचे नाव किशन राठोड यांनी प्रस्तावित केले, तर त्यास शेषेराव लढे यांनी अनुमोदन दिले. उपस्थित सर्व ९ संचालकांनी एकमताने ठराव मंजूर करून यशवंत पाटील कऱ्हाळे यांची बिनविरोध निवड जाहीर केली.

या निवडीबद्दल आमदार भीमराव केराम, दत्ता आडे, स्वागत आयनेनीवार, विजय पावडे, बालाजी पावडे, रामराव कऱ्हाळे, कैलास कऱ्हाळे, बबलू नाईक, नंदकिशोर कऱ्हाळे पाटील, विठ्ठल सुरोशे, नारायण पाटील कऱ्हाळे, रंजीत कऱ्हाळे, सरपंच देवजी नैताम, मारोतीराव भरकड, विजय मडावी, भास्कर पाटील, वामन इंगळे, राजू कऱ्हाळे, विनायक कऱ्हाळे, प्रदीप कऱ्हाळे, शिवाजी पाटील कऱ्हाळे, अनंता कोकारे, प्रकाश पाटील बेंद्रे, शेषेराव पेंदोर, अशुतोष बेंद्रे, निकेतन सुरोशे, रमेश गेडाम, अशोकराव करोडेकर आदी मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या. सभेचा समारोप समाधानकारक वातावरणात झाला.